# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला,
एक्सप्रेस टावर्स,
नरिमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४९
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ ९३४८
एस.टी.डी. : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई.

क्र. मजीप्रा.1098/सभा-79/आ-4.

1998/06/01.

विषय : महा. जीवन प्राधिकरणाच्या 79 व्या सभेचे इतिवृत्त.

बुधवार दिनांक 20 मे, 1998 रोजी संपन्न झालेल्या महा. जीवन प्राधिकरणाच्या 79 व्या सभेचे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

सोबत : 79 व्या सभेचे इतिवृत्त.

(राजेंद्र सगणे)
सदस्य सचिव (तांत्रिक) / (प्रशासन व बा.अ.स.)

प्रति,

अपर मुख्य सचिव,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
तथा महा. जीवन प्राधिकरणाचे सदस्य.

मा. मंत्री,
पाणी पुरवठा व स्वच्छता,
तथा महा. जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष.

# दिनांक 20 मे 1998 रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या 79 व्या बैठकीचे इतिवृत्त.

प्राधिकरणाची 79 वी बैठक मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अध्यक्ष, मा.अण्णासाहेब डांगे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीस पुढीप्रमाणे उपस्थिती होती :–

1) मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे उपाध्यक्ष.
2) अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग व सदस्य.
3) श्री.सुरेश पटवर्धन, सदस्य.
4) श्री.भानुदास पडळकर, सदस्य.
5) श्री.देवेंद्र फडणवीस, नागपूरचे महापौर व सदस्य.
6) श्री.आशिष कुलकर्णी,सदस्य.
7) श्री.माधव कुलकर्णी,सदस्य.
8) श्री.आदिनाथ नवलेपाटील,सदस्य
9) श्री.राजेंद्र सिंग, प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय व सदस्य.
10) श्री.राजेंद्र सगणे, सदस्य सचिव(तांत्रिक),महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील अधिकारी "विशेष निमंत्रित" म्हणून उपस्थित होते :–

1) श्री.नि.कृ.माडा, मुख्य प्रशासकीय अधिकारी.
2) श्री.भा.आ.डोंगरे, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी.
3) श्री.एस.डी.अरमाळ,मुख्य अभियंता,ठाणे.
4) श्री.डी.के.भसाळे,मुख्य अभियंता,नागपूर
5) श्री.एस.व्ही.शेळकीकर, मुख्य अभियंता, पुणे.
6) श्री.एस.के.पाटील, मुख्य अभियंता,नाशिक.
7) श्री.डी.के.तोंबरे,मुख्य अभियंता, अमरावती.
8) श्री.अ.ना.अळवणी,मुख्य अभियंता(बाहय अर्थसहाय्य)

अनुपस्थित सदस्यांनी आपल्या अनुपस्थितीची कल्पना दिली होती. तसेच प्राधिकरणाचे सदस्य सचिव(प्रशासन व बाहय अर्थसहाय्य) हे प्रशिक्षणाचे निमित्ताने विदेश दौ–यावर आहेत असे सांगण्यात आले.

बैठकीच्या कार्यसूचीप्रमाणे रीतसर चर्चा होण्यापूर्वी प्राधिकरणाच्या अध्यक्षांनी इतर काही विषयांबाबत चर्चा व्हावी असे सुचविले, त्यानुसार पुढील विषयावर चर्चा झाली:–

अ) बृहत आराखडयातील कार्यक्रमांच्या अंमलबजावणी संदर्भात शासनाने फार मोठा कार्यक्रम हाती घेतला असल्यामुळे, त्याची यशस्वीरित्या अंमलबजावणी करुन 2000 सालापर्यंत पाणी पुरवठा उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात प्राधिकरणाच्या प्रत्येक बैठकीत (शक्यतो दर महिन्यात) याबाबतच्या प्रगतीचा आढावा घेण्यात यावा. त्यामध्ये कामाचा आराखडा, टंचाईची स्थिती, किती योजना तयार करावयाच्या होत्या, त्यातील किती तयार करण्यात आल्या, अद्याप किती करावयाच्या आहेत, किती योजनांना प्रशासकीय मान्यता मिळाली, किती योजनांना प्रशासकीय मान्यता मिळणे प्रलंबित आहे , किती योजना प्रगतीपथावर आहेत, किती योजनांना मंजूरी दिलेली आहे, पण कामास सुरुवात झालेली नाही. किती

योजनांच्या निविदा मागविण्यात आल्या आहेत, किती योजनांसाठी निविदा काढावयाच्या आहेत इत्यादी माहिती देण्यात यावी. त्याचबरोबर या योजनांच्या अंमलबजावणीच्या संदर्भात महसूल विभाग निहाय काही खास अडचणी असतील तर त्या ध्यानांत आणून द्याव्या. तसेच काही योजना रेंगाळल्या असतील तर त्याबाबतही ऊहापोह करण्यात यावा.

आ) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे ज्या निविदा काढल्या जातात, त्यासाठी इसारा रकम भरण्याची जी पध्दत आहे त्या संदर्भात एका कंत्राटदाराने आपल्याकडे तक्रार केलेली आहे असे मा.अध्यक्षांनी सांगितले. सध्याच्या पध्दतीनुसार एखादयाने एके ठिकाणी इसारा रकम भरल्याबाबतचा दाखला मिळाल्यावर त्या आधारे अनेक ठिकाणी निविदा भरल्या जावू शकतात. तथापि, काही कंत्राटदारांकडून या सुविधेचा दुरुपयोग केला जातो, अशाही त्यांच्याकडे तक्रारी आलेल्या आहेत. एखादे काम मिळाल्यानंतरही त्याच सुविधेच्या आधारे इतर ठिकाणीही त्यांच्याकडून निविदा भरल्या जातात व ज्यांना काम मिळत नाही त्यांची अडचण होते व एकप्रकारे त्यांच्यावर अन्याय होतो, असेही त्यांनी सांगितले.

सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी त्यावर खुलासा केला की, याबाबत निर्णय घेण्यात आला असून अशा प्रकारे देण्यात आलेली सुविधा त्वरित रद्द करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

इ) अनेक योजनांमध्ये डी.आय.पाईप्स् वापरले जातात. या संदर्भातही मा.मंत्री महोदयांनी एक मुद्दा उपस्थित केला. या पाईपांची गुणवत्ता उत्कृष्ट आहे याबद्दल वाद नाही. तथापि, हे पाईप निर्माण करणारी एकमेव कंपनी भारतात आहे. तेंव्हा अशा परिस्थितीत या कंपनीची क्षमता पाहता व इतर राज्यांना पुरवठा करुन झाल्यावर महाराष्ट्रास जितके पाईप्स् उपलब्ध करुन दिले जातील, त्याच्या मानाने एकूण गरज जर खूप जास्त असेल तर गरजेएवढा पुरवठा होऊ शकणार नाही, अशी विसंगती होऊ शकते आणि वाढीव गरजांच्या संदर्भात वेळीच जर पाईप उपलब्ध झाले नाहीत तर पाईपांच्या उपलब्धतेस विलंब होईल आणि कामे मागे पडतील काय, हा विचार करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

त्यावर सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी खुलासा केला की, हे डी.आय.पाईप्स् सर्वसाधारणपणे मुख्यतः नागरी भागातच वापरले जातात आणि ग्रामीण योजनांसाठी अपवादानेच (मोठया योजनांसाठी) वापरले जातात. त्यांनी असेही सांगितले की, आजवर पाईप उपलब्ध करुन देण्याबाबत काही अडचणी आलेल्या नाहीत. तथापि, इतर राज्यांची मागणी यापुढे किती असेल हेही ध्यानांत घ्यावे लागणार आहे असा अभिप्राय व्यक्त करण्यात आला.

सध्या ज्या दराने या कंपनीकडून पाईप विकत घेण्यात येत आहेत, त्यांच्या किंमतीत वाढ होऊ शकेल काय या विचारणेवर होकारार्थी उत्तर देण्यांत आले. सदस्य श्री.सुरेश पटवर्धन यांनी त्या कंपनीची क्षमता, इतर ठिकाणच्या कमिटमेंटस व आपल्या गरजा या सा–यांचा आढावा घ्यावा अशी सूचना केली.

सदस्य श्री.माधव कुलकर्णी यांनी या मुद्यावर भर दिला की, डी.आय. पाईप उपलब्ध करुन देण्यारी कंपनी भारतात एकच आहे. ही कंपनी पाईप उपलब्ध करु शकली नाही तर अडचणीची परिस्थिती निर्माण होईल. तेंव्हा या पाईपांऐवजी दुस–या कोणत्या पाईपांचा वापर करण्याजोगा असेल तर त्याचा विचार व्हावा. त्यावर अपर मुख्य सचिवांनी असे ध्यानांत आणून दिले की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांकडून कार्यान्वित होणा–या सर्व नागरी व ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी कोणत्या प्रकारचे

पाईप वापरले जावेत याचा सखोल विचार करुन शिफारस करण्यासाठी शासनाने एका समितीची स्थापना केली आहे. या समितीवर प्राधिकरणाबाहेरचे सदस्य घेण्यात आले आहेत आणि या समितीकडून या संदर्भात येणा–या सर्व बाबींचा, अडचणींचा संपूर्ण विचार होऊन वस्तुनिष्ठपणे निर्णय होण्याची अपेक्षा आहे. त्यावर या समितीची बैठक 3 दिवसांत आयोजण्यात यावी अशी मा.अध्यक्ष महोदयांनी सूचना केल्यावर या समितीची पहिली बैठक दि.28 मे 1998 रोजी होणार असल्याचे सांगण्यात आले.

डी.आय.पाईप वापरण्याचा प्रस्ताव का करण्यात येतो हा मुद्दा स्पष्ट करण्याचे दृष्टीने सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी असे सांगितले की, बिडाचे पाईप, डी.आय.पाईप व पोलादी पाईप या पाइपांवर येणारा पाण्याचा दाब आदी तांत्रिक बाबी व त्याबाबतचे अर्थशास्त्र यांची सांगड घालण्यात येते.

इ) डोंबिवली येथे नागरीकांना जो दूषित पाणी पुरवठा होत आहे त्याबद्दल आलेल्या त क्रारींचा मुद्दा अध्यक्ष महोदयांनी उपस्थित केला. कोकण विभागाच्या मुख्य अभियंत्यांनी अशी माहिती दिली की, या तक्रारींची त्यांना कल्पना असून, हा प्रश्न जरी कल्याण महानगरपालिकेचा असला तरी प्राधिकरणाच्या अधिका–यांना महापालिकेस मार्गदर्शन करण्यास सांगण्यात आले आहे.

उ) अध्यक्ष महोदयांनी आणखी एका तक्रारीची माहिती दिली की, गोडसाई–टिटवाळा या पाणी पुरवठा योजनेतूनही पाणी मिळत नाही अशी तक्रार आहे. एका बाजूने जवळच्या फार्म हाऊसला 24 तास पाणी पुरवठा होतो, तर लोकांना पाणी मिळत नाही असे तक्रारीचे स्वरुप आहे. याबाबतीत कल्याण महानगरपालिकेस कार्यवाही करावी लागेल असे ध्यानांत आणल्यानंतर मुख्य अभियंता, कोकण प्रदेश यांनी या संदर्भात विचारणा करावी असे मा.मंत्री महोदयांनी आदेश दिले.

ऊ) तसेच शहापूर भागातही पाणी पुरवठयाबाबत ब–याच तक्रारी आहेत असे मा.मंत्री महोदयांनी ध्यानांत आणून दिले. ही बाब जिल्हा परिषदेच्या अखत्यारित येते असे ध्यानांत आणून दिल्यावर त्या संदर्भातही मुख्य अभियंत्यांनी जिल्हा परिषदेकडे संपर्क साधून चौकशी करावी अशा मा.मंत्री महोदयांनी सूचना केल्या.

ए) भाईंदर पाणी पुरवठा योजने संदर्भात ज्या निविदा मागविण्यात आल्या आहेत, त्याबाबत वृत्तपत्रात तक्रारी आल्या असून, त्यामध्ये "अधिकारी अस्वस्थ" असाही उल्लेख असल्याचे सांगण्यात आले. त्यावर कोकण प्रदेशाच्या मुख्य अभियंत्यांनी माहिती दिली की, याबाबत प्राधिकरणाचा खुलासा वृत्तपत्राकडे प्रसिध्दीसाठी पाठविण्यात आला आहे.

ऐ) **<u>अभियंता संघटनेच्या अधिवेशनाचे वृत्त</u>**

प्राधिकरणाच्या अध्यक्षांनी असे निदर्शनास आणले की, प्राधिकरणाच्या अभियंता संघटनेचे वार्षिक अधिवेशन नागपूर येथे अलीकडे झाले, त्यामध्ये शासनाने बृहत आराखडयातील पाणी पुरवठा योजना पूर्ण करावयाचा जो कार्यक्रम हाती घेतलेला आहे , त्याबाबत टीका करण्यात आली , असे वृत्तपत्रातील वृत्तावरुन दिसते. या संदर्भात दै.लोकसत्तातील वृत्ताचा तसेच महाराष्ट्र टाईम्स्मधील वृत्ताचा उल्लेख करण्यात आला.

मा.मंत्री महोदयांनी असा अभिप्राय व्यक्त केला की, या वृत्तानुसार शासनावर टीका करण्यात आली आहे व संघटनेकडून अशी टीका केली जाऊ नये. संघटनेने आपली कार्यकक्षा, मुख्यतः त्यांना

दैनंदिन येणा–या अडचणी, पदांची निर्मिती, बदल्या,बढत्या, वेतनश्रेणी इत्यादी बाबींपुरती ठेवायला हवी. आपली मते मांडण्याचा, त्याबाबत आग्रह धरण्याचा त्यांना जरुर हक्क आहे. तथापि, विरोधी पक्षाव्दारे केली जाते तशी टीका करता येणार नाही.

दै.लोकसत्तामध्ये प्रसिध्द झालेले वृत्त आणि अधिवेशनामध्ये करण्यात आलेली चर्चा व त्याबाबतची वस्तुस्थिती दर्शविणारा एक अहवाल संघटनेकडून प्राप्त झाला आहे, असे सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी सांगितले व हा अहवाल मा.मंत्री महोदयांच्या स्वाधीन केला. त्यातील मजकूराची कल्पना सदस्यांना सर्वसाधारणपणे देण्यात आली.

त्या संदर्भात अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनीं असे अभिप्राय व्यक्त केले की, झालेली चर्चा व प्रसिध्द झालेले वृत्त यामध्ये विसंगती असेल तर संघटनेने त्याबाबतचा खुलासा वृत्तपत्राकडे कळवावयास हवा. त्यांनी पुढे असेही ध्यानांत आणून दिले की, संघटनेच्या अनेक मागण्या शासनाने मान्य केलेल्या आहेत. क्षेत्रीय स्तरावर कामावर देखरेख ठेवता यावी या दृष्टीने मुख्य अभियंत्यांच्या पदांची निर्मिती करावयाची मागणी मान्य झालेली आहे. तांत्रिक सहाय्यक उपलब्ध करुन दयावेत अशीही मागणी होती ती पदे निर्माण करण्यात आली आहेत. वाढीव प्रमाणात अधीक्षक अभियंता तथा जिल्हा पाणी पुरवठा अधिका–यांची पदे निर्माण केली आहेत. पूर्वीपेक्षा अधिक प्रमाणावर निधीही उपलब्ध करुन दिला जात आहे. अशा परिस्थितीत तरी अशी टीका होणे योग्य नाही असे त्यांचे अभिप्राय होते.

मा.मंत्री महोदयांनी असेही मत व्यक्त केले की, आपण आजवर शक्यतो या सर्वांच्या अडचणी समजून घेऊन, एवढेच नव्हेतर वेतनश्रेणी सारख्या अनेक मागण्या मान्य केल्या. एकप्रकारे त्यांचे लाड करण्यात आले असे म्हणण्याजोगे आहे. अशा परिस्थितीत टीका करणे योग्य नाही. ,

अपर मुख्य सचिवांनी अशीही अपेक्षा व्यक्त केली की, शासनाने एवढया मोठया प्रमाणावर पाणी पुरवठा कार्यक्रम हाती घेतला असल्यामुळे व त्या संदर्भात यंत्रणेत होणारी वाढ, नवीन पदांची निर्मिती या दृष्टीकोनातून अभियंत्यांना आनंद व्हावयास हवा. सदस्य श्री.पडळकर यानी अशी सूचना केली की वृत्तपत्रातील वृत्त चुकीचे असेल तर त्याबाबत [illegible] संदर्भात संघटनेने जो खुलासा [illegible] वस्तुस्थिती काय आहे हे [illegible]

[illegible]

'झाडावरच्या फांदीवर असून [illegible]' [illegible] महोदयांनी असेही सांगितले की, या [illegible] चर्चा झाली त्याबाबत संघटनेने एक पत्र पाठविले असून, या पत्रात थोडया–फार फरकाने तेच मुद्दे मांडले असून भाषेत बदल आहे.त्या अनुषंगाने त्या पत्रातील अनेक बाबींचा त्यांनी उल्लेख केला आणि असे अभिप्राय व्यक्त केले की, अशा प्रकारची व्यक्तव्ये संघटनेच्या माध्यमातून करणे योग्य नाही.

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे राज्यमंत्री तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष यांनी, संघटनेचे काही खरे प्रश्न व अडचणी असतील, त्यांना कामे करता येणे अवघड होत असेल तर त्याबाबत , त्यांच्या ख–या दुखण्याबाबत त्यांच्याशी चर्चा करण्यात यावी व त्यासाठी बैठक लवकर बोलविण्यात यावी अशी सूचना दिली. तथापि. याबाबत कारवाईही केली जावी.

....5...

हे अधिवेशन नागपूर येथे झाले असल्यामुळे नागपूरच्या मुख्य अभियंत्यांनी याबाबत काय कार्यवाही केली. या मा.मंत्री महोदयांच्या विचारणेवर ही बाब नागपूरच्या मुख्य अभियंत्यांपुरती मर्यादित नसून राज्यस्तरावर हे अधिवेशन घेण्यात आले होते असा नागपूरच्या मुख्य अभियंत्यांनी खुलासा केला.

नागपूरच्या महापौरांनी मत व्यक्त केले की, शासनाच्या कार्यक्रमावर अंमलबजावणी करणा–या अभियंत्यांनीच टीका केल्याने शासनाची बदनामी झाली आहे. उपाध्यक्षांनी सदस्य सचिव(तांत्रिक) यांना अशा सूचना केल्या की, त्यांनी आधी सूचना केल्याप्रमाणे संघटनेच्या पदाधिका–यांशी चर्चा करण्यात यावी. प्राधिकरणाच्या स्तरावर कारवाई करण्याबाबत विचार केला जाईलच पण सदस्य सचिवांनी आपल्या स्तरावरही कारवाई करावी. तसेच, त्यांनी सुचविल्याप्रमाणे अभियंत्यांच्या प्रश्नांबाबत चर्चा करण्यासाठी बैठक लवकर बोलवावी असे सांगितले.

जे काही झाले ते योग्य नाही व प्राधिकरणाची बैठकीत याबाबत नाराजी व्यक्त करण्यात येत आहे असे सांगून या विषयावरील चर्चेचा मा.मंत्री महोदयांनी समारोप केला.

**कार्यक्रम बाब क्र.1 : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या 78 व्या सभेच्या इतिवृत्तास मान्यता देणे.**

वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी यांनी असे निदर्शनास आणून दिले की, पृष्ठ क्र. 8 वर जो ठराव करण्यांत आल्याचे म्हटले आहे, त्यामध्ये थोडी सुधारणा करण्यांत यावी. गेल्या (78 व्या) बैठकीमध्ये ही बाब जेव्हा चर्चेस आली होती तेव्हा त्यावेळच्या कार्यक्रम बाबीच्या संचातील पृष्ठ क्र.15 वर उल्लेख केल्याप्रमाणे (अ) आयुर्विमा महामंडळाकडून रु. 7028 लाख कर्ज उभारणी (ब) नागरी पाणी पुरवठा योजनांसाठी आयुर्विमा महामंडळाकडून रु.2503.85 लाख कर्ज उभारणी व (क) हुडकोकडून रु. 1564.35 लाख अनुदान मिळवणे व रु. 1857.64 लाख कर्ज उभारणीस मंजूरी मिळवणेबाबत विनंती करण्यांत आली होती. तथापि त्याचा इतिवृत्तामध्ये योग्यप्रकारे उल्लेख करण्यांत आलेला नाही. हा ठराव खालीलप्रमाणे असावा अशी त्यांनी विनंती केली.

ठराव :

खालील फिरवून मंजूर केलेल्या कार्यक्रम बाबींचे प्राधिकरण अनुसमर्थन करीत आहे.

(1) सन 97–98 मध्ये आयुर्विमा महामंडळाकडून प्रकल्प योजनांसाठी करावयाची कर्ज उभारणी (रु.7028.00 लाख) (परिशिष्ट–अ).

(2) सन 97–98 मध्ये नागरी पाणी पुरवठा व जलनिःसारण योजनांसाठी चालू व नवीन योजनांकरिता आयुर्विमा महामंडळाकडून योजनांतर्गत कर्ज उभारणी रु. 2503.85 लाख (परिशिष्ट–ब).

(3) नागरी भागाकरिता, कमी खर्चाची स्वच्छता योजना–वैयक्तीक शौचकूप बांधकामाकरिता हुडकोकडून रु.1564.35 लाख अनुदान व रु.1857.64 लाख कर्ज उभारणीस प्राधिकरणाची मंजूरी मिळणेबाबत (परिशिष्ठ–क).

सदस्य श्री.सुरेश पटवर्धन यांनी असा अभिप्राय व्यक्त केला की, धोरणात्मक दृष्टया जे आवश्यक होते त्याबाबत ठराव करण्याची कार्यवाही करण्यांत आली होती, व आता जी चूक राहून गेली ही टंकलेखनातील आहे, हे जरी खरे असले तरी, इतिवृत्तामध्ये अशा गोष्टी राहून जाणे उचित नाही. तेव्हा यापुढे सर्व संबंधितांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी व कार्यक्रम बाब असो वा इतिवृत्त असो, त्यातील

सर्व बाबी नीट तपासून घ्याव्यात.

ठरावातील वरील दुरुस्तीस अनुमोदन देण्यांत आले.

प्राधिकरणाच्या माननीय उपाध्यक्षांनी यासंदर्भात वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी यांना अशी सूचना केली की, एकूण कार्यक्रमासंदर्भात कर्जाचे एकूण प्रमाण किती, आजवर आपण किती कर्ज घेतले, किती फेडले, परतफेडीची जबाबदारी कोणावर टाकावयाची, त्याबाबत अडचणी काय आहेत, एवढेच नव्हेतर कर्जरोख्याद्वारे जो निधी उभारला आहे त्या निधीपैकी किती रक्कम खर्च केली त्याबाबतची माहिती, यापुढे कर्ज उभारणीबाबत काय कार्यक्रम आहे, ही सर्व माहिती उपलब्ध करुन द्यावी. मा. मंत्रीमहोदय तथा प्राधिकरणाच्या अध्यक्षांनी याबाबत आढावा घेऊन पुढील बैठकीमध्ये ही माहिती उपलब्ध करुन देण्याची सूचना दिली.

मा.राज्यमंत्री तथा प्राधिकरणाच्या उपाध्यक्षांनी, टँकरमुक्ती कार्यक्रमाचा वारंवार आढावा घेण्यांत यावा व गेल्या वर्षी किती गावे टँकरमुक्त करावयाची होती, प्रत्यक्षांत किती झाली, या वर्षाची परिस्थिती काय आहे., त्याबाबतच्या अडचणी काय आहेत ही माहिती देण्यांत याची अशी सूचना केली.

त्याचबरोबर त्यांनी "गुणवत्ता नियंत्रण तसेच दक्षता पथक" या गोष्टींचा उल्लेख केला. याबाबत अनेक वेळा मुद्या उपस्थित करुनही कार्यवाही न झाल्याचे सांगितले. दक्षता पथकाच्या संदर्भात राज्याचे 4 झोन पाडण्यांत यावेत व त्या त्या झोनमध्ये कार्यान्वित होत असलेल्या योजनांना सहजगत्या निवडलेला नमूना (रेंडम सॅपलिंग) पध्दतीने अचानक भेट देऊन तपासणी करण्यांत यावी असे सुचविले. तक्रार आल्यावरच कार्यवाही करावयाची अशी पध्दत असण्याची आवश्यकता नाही असे त्यांनी सांगितले. आपली ही सूचना रास्त व पटण्याजोगी आहे, ज्यामुळे निश्चितच कामाची गुणवत्ता सुधारेल आणि म्हणून इतर सदस्यांनी त्यावर विचार करावा अशीही त्यांनी सूचना केली.

कर्जरोख्याच्या संदर्भात पुढीलप्रमाणे मुद्दा उपस्थित करण्यांत आला.

मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाच्या उपाध्यक्षांनी, प्राधिकरणाच्या रोखे उभारणीचा निर्देश केला. महा.जीवन प्राधिकरणाचा अधिकारी वर्ग प्राधिकरणास रोखे उभारणीसंदर्भात योग्य व पुरेशी माहिती देत नाही असे मत व्यक्त केले. त्यांनी याबाबत प्राधिकरणाचे ९८–९९ चे उद्दिष्ट काय याबाबत माहिती मागितली.

प्राधिकरणाचे सदस्य श्री.माधव कुलकर्णी, यांनी सदस्य सचिव (प्रशासन व अर्थ) यांना त्यांनी काही दिवसापूर्वी रोखे उभारणी संदर्भात काही माहिती विचारली असता त्यांनी ( सदस्य सचिव ) ही माहिती गोपनीय असल्यामुळे देता येत नाही असे सांगितलयाची बाब मा.मंत्रीमहोदयांच्या निदर्शनास आणली. रोखे उभारणी संदर्भातील काही तपशील वृत्तपत्रात प्रसिध्द झाला आहे. हे पाहता त्याचा गोपनीयतेशी संबंध जोडण्याचे काही कारण दिसत नाही असे मत त्यांनी व्यक्त केले.

मा.राज्यमंत्रीमहोदय व उपाध्यक्ष यांनी प्राधिकरणाकडे रोखे उभारणी संदर्भात सहाय्य देण्यासाठी कोणत्या एजन्सीनी संपर्क साधला होता हे जाणून घ्यायची इच्छा व्यक्त केली. त्यांनी असाही मुद्या मांडला की. पुर्वी रोखे उभारणी संदर्भात एक व्यक्ती/संस्थेने त्यांच्याशी संपर्क साधला होता व या संबंधात

सहाय्य देण्याची तयारी दाखविली होती की, ज्यामुळे प्राधिकरणास आकर्षक व कमी व्याजदराने कर्जरोखे उभारता आले असते. परंतु असे दिसते की, प्रस्तुत प्रकरणी त्यांच्या सूचनांची दखल प्राधिकरणाच्या अधिका-यांनी घेतलेली नाही. प्राधिकरणाने, पूर्वी कल्पना केली गेली होती त्यापेक्षा अधिक व्याज दर देऊन रोखे उभारणी केली आहे असे दिसते. तथापि मा.अध्यक्षांनी हे स्पष्ट केले की, जेव्हा रोखे उभारणीची प्रक्रिया सुरु होती त्यावेळी मा.मुख्यमंत्र्यांनी सहयाद्री अतिथीगृहावर संभाव्य गुंतवणूकदारांची एक बैठक बोलावली होती व त्यांना या रोख्यांना उदार आश्रय देण्याची विनंती केली होती. त्यावेळी रोख्यांचा प्रस्तावित व्याज दर 9 ते 9.5 टक्के होता. तथापि त्यावेळी प्रत्यक्षांत काही अन्य म.रा.वि.मंडळासारख्या शासकीय/अर्धशासकीय संस्थांनी 11.5 टक्के दराने कर्जरोखे उभारणी सुरु केली होती. अशा परिस्थितीत 9.5 टक्के व्याजदराने रोखे उभारणीस शासनास कितपत प्रतिसाद मिळेल याबाबत या बैठकीस उपस्थित असलेल्या बँकर्सनी आश्चर्य व्यक्त केले होते. मा.अध्यक्षांनी याचा सुध्दा उल्लेख केला की, अन्य शासकीय/अर्धशासकीय विभागांना सल्ला देणारी व प्राधिकरणास सल्ला देणारी एजन्सी एकच होती. प्राधिकरणाला दिलेल्या बदसल्ल्यामुळे या एजन्सीवर ठपका ठेवण्यांत आला व कालांतराने रोखे व्यवस्थापकांच्या यादीतून त्यांचे नांव वगळण्यांत आले.

इतिवृत्तातील पान-4 वरील भाववाढीच्या संदर्भात चर्चा करण्यांत यावी अशी, सदस्य श्री.माधव कुलकर्णी यांनी विनंती केली, "या मुद्यावर प्राधिकरणाकडून आणखी काही कार्यवाही करण्याची गरज नाही असे ठरले" या इतिवृत्तातील अखेरच्या वाक्यास ( पृष्ठ 4 ) श्री.माधव कुलकर्णी यांनी आक्षेप घेतला. त्यावर मंत्रीमहोदयांनी असा निर्णय दिला की, या विषयावर अन्यप्रकारे चर्चा होऊ शकेल. मात्र सध्या इतिवृत्त मंजूर करण्याच्या बाबीवर चर्चा होत असून त्यावर काही आक्षेप आहेत काय, सदस्य जे बोलले, जे अभिप्राय व्यक्त केले ते इतिवृत्तात समाविष्ठ आहेत किंवा नाही इत्यादी बाबीच फक्त ध्यानात घ्याव्यात.

याबाबत श्री.सुरेश पटवर्धन यांनी अशी माहिती दिली की, भाववाढीपोटी रकम देण्याबाबत कोणते नियम आहेत आणि ती कशाप्रकारे दिली जाते याबाबत गेल्या बैठकीत चर्चा झाली आणि म्हणून तेवढयापुरती या प्रकरणी काही कार्यवाही करण्याची गरज नाही असा इतिवृत्तात उल्लेख झालेला दिसतो. त्यावर "आपले याबाबत समाधान झालेले नाही" असे सदस्य श्री.माधव कुलकर्णी यांचे म्हणणे होते.

त्यावर राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष यांनी असे सुचविले की, भाववाढीपोटीची रकम (Price Escalation) देण्याची पध्दत यापुढेही चालू ठेवणे आवश्यक आहे किंवा नाही याबाबत अधिक विचार करुन निर्णय घेणे उचित राहील.

या चर्चेनंतर 78 व्या बैठकीचे इतिवृत्त मंजूर करण्यांत आले.

**<u>कार्यक्रम बाब क्र.2 : महा.जीवन प्राधिकरणाच्या 78 व्या सभेतील बाबींवर करण्यांत आलेली कृती.</u>**

**<u>कार्यक्रम बाब क्र.3 : (78 व्या सभेतील) : म.जी.प्रा. चे सन 97-98 वर्षाचे सुधारित अंदाजपत्रक व 98-99 चे अंदाजपत्रक. -- विविध वित्तीय संस्थांकडून मिळवावयाच्या निधीबाबतचा तक्ता तसेच स्थानिक संस्थांकडे असलेल्या थकबाकीच्या वसूलीबाबतची कार्यक्रम बाब.</u>**

अपर मुख्य सचिवांनी " केलेल्या कृतीच्या " संदर्भात अशी सूचना केली की, निधीबाबतचा तक्ता जोडणे व स्थानिक स्वराज्य संस्थांकडे असलेल्या थकबाकीची वसूली या दोन भिन्न बाबी असून त्यांचा

स्वतंत्रपणे उल्लेख करावयास हवा होता. शिवाय थकबाकीच्या वसूलीबाबत 79 व्या सभेपुढे कार्यक्रम बाब ठेवण्यांत येत आहे असा जो उल्लेख आहे, त्या संदर्भात "ही बाब स्वतंत्र कार्यक्रम बाबीद्वारे मांडण्यांत आली आहे" असा उल्लेख करणे योग्य झाले असते असे सदस्य श्री.सुरेश पटवर्धन यांनी मत व्यक्त केले.

थकबाकीच्या वसूली संदर्भात एक स्वतंत्र बैठक घेण्यांत यावी असे मा.उपाध्यक्षांनी सूचविले.

**कार्यक्रम बाब क्र.4 : (78 व्या सभेतील) : सन 97–98 मध्ये नागरी पाणी पुरवठा व जलनिःसारण योजनांसाठी चालू व नवीन योजनांकरिता आयुर्विमा महामंडळाकडून योजनांतर्गत कर्ज उभारणी.**

" कार्यवाही झाली आहे म्हणजे नेमके काय " अशी विचारणा करण्यांत आली, त्यावर वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी यांनी असा खुलासा केला की, नागरी योजनांसाठी आयुर्विमा महामंडळाकडून 50 कोटी रुपये कर्जसहाय्य प्राप्त झाले व त्याचे वाटप करण्यांत आले. तसेच अल्प खर्चाच्या स्वच्छता कार्यक्रमांतर्गत 15.64 कोटी रुपये अनुदान मिळावे तसेच 18.57 कोटी रुपयांचे कर्ज सहाय्य मिळावे या दृष्टीने हुडकोकडे प्रस्ताव सादर करण्यांत आला असून तो हुडकोच्या विचाराधीन आहे.

केंद्र शासनाकडून महाराष्ट्रास ग्रामीण पाणी पुरवठा योजनांतर्गत सुमारे 500 कोटी रुपये निधी उपलब्ध होण्याच्या शक्यता आहे अशी मा.अध्यक्षांनी माहिती दिली. तसेच 20,000 लोकवस्ती पर्यंतच्या नागरी योजनांपैकी 10 योजना मंजूर झालेल्या असून उरलेल्या योजनांबाबत पाठपुरावा करण्यांची गरज आहे असे त्यांनी सांगितले. निधी उपलब्ध होण्या संबंधीचे गांभीर्य लक्षात घेऊन युध्दपातळीवर प्रयत्न करावयाची आवश्यकता असून लवकरात लवकर याबाबतचा प्रस्ताव पाठविण्यांत यावा अशी सूचना मा. अध्यक्षांनी केली. त्यावर अपर मुख्य सचिवांनी अशी माहिती दिली की, नुकतीच त्यांची या संदर्भात केंद्र शासनाच्या सचिवांशी चर्चा झाली आहे. केंद्र शासनाचे व राज्य शासनाचे निकष वेगळे असून केंद्र शासनाच्या निकषांना उतरणा–या योजनांनाच केंद्राचे अर्थसहाय्य मिळू शकेल. तशा योजना केंद्र शासनाला सत्वर पाठवाव्यात अशा सूचना मा.मंत्रिमहोदयांनी केल्या.

**कार्यक्रम बाब क्र.5 : (78 व्या सभेतील) : म.जी.प्रा.च्या संचालकीय मंडळातील अशासकीय सदस्यांना विभागीय चौकशी प्रकरणांबाबत माहिती उपलब्ध करुन देण्याच्या मर्यादांबाबत.**

दक्षता पथकाच्या संदर्भात अशी माहिती देण्यांत आली की, याबाबतच्या प्रस्तावाची एक टिप्पणी अपर मुख्य सचिवांना सादर करण्यांत आली आहे. त्यावर मा.अध्यक्ष महोदयांनी अशी सूचना केली की, घोटाळे, तक्रारी इत्यादीबाबत झटकन भेट देऊन चौकशी करण्याच्या दृष्टीने एका दक्षता पथकाची आवश्यकता आहे.

दक्षता पथकाच्या कामाची व्याप्ती ही फक्त गुणवत्तेच्या संदर्भात असणार आहे की प्राधिकरणाच्या अधिका–यांबद्दल करण्यांत आलेल्या तक्रारींची दखल हे दक्षता पथक घेईल अशी विचारणा सदस्य श्री. माधव कुलकर्णी यांनी केली. त्यावर, प्राधिकरणाशी संबंधित असलेल्या सर्व बाबी या दक्षता पथकाकडे सोपविण्यांत येतील असे आदेश मा.अध्यक्षमहोदयांनी दिले.

गुणवत्ता नियंत्रणाच्या संदर्भात फक्त 1 अधीक्षक अभियंता व 3 कार्यकारी अभियंता अशी यंत्रणा प्राधिकरणात असून तक्रारींचे प्रचंड स्वरुप पाहता हे अधिकारी कसे पूरे पडणार असा अभिप्राय मा.

घेऊन, त्यांनी पहाणी करुन कार्यवाही सुचवतील अशी त्यांची सूचना होती. शिवाय त्यांनी असा मुद्दा मांडला की, या संदर्भात राज्यात 4 भाग (झोन) पाडण्यांत यावेत आणि तिथे कार्यान्वित होत असलेल्या योजनांची स्वैर वा सहजगत्या निवडलेला नमुना (रॅन्डम सॅम्पल) पध्दतीने तपासणी करावी. शिवाय दक्षता पथकाने प्राधिकरणास प्राप्त झालेल्या तक्रारींचीही दखल घ्यावी.

ही बाब एकदा तत्वतः मान्य केल्यानंतर प्रत्यक्ष कार्यवाही कशी केली जावी, या पथकाची संरचना कशी असावी, त्यासाठी कोणत्या दर्जाचे अधिकारी उपलब्ध करुन द्यावेत या सर्व बाबी ठरविता येतील असा अभिप्राय त्यांनी व्यक्त केला. मुख्य म्हणजे हे दक्षता पथक थेट सदस्य सचिवांच्या नियंत्रणाखाली असू नये अशीही त्यांची सूचना होती. त्यावर मा.मंत्रीमहोदयांनी अशी माहिती दिली की, विरमाता जिजाबाई टेक्निकल इंस्टिटयूट, वालचंद इंजिनियरींग कॉलेज अशा सारख्या महाविद्यालयातील तज्ञ या दक्षता पथकात घेण्यांत येणार आहेत. तथापि ही सर्व मंडळी प्रामुख्याने अध्यापन करणारी असून क्षेत्रिय कामकाजाचा, तेथील कार्यपध्दतीचा, तेथील अडीअडचणींचा त्यांना अनुभव असणार नाही म्हणून अशाप्रकारचा अनुभव असणा-या एका वरिष्ठ अभियंत्यांची या पथकामध्ये नेमणूक होणे अगत्याचे आहे असे त्यांनी सांगितले.

या संदर्भात जागतिक बँकेचे अर्थसहाय्याने हाती घेतलेल्या प्रकल्पासाठी नेमलेल्या त्रयस्थ यंत्रणेकडून घेण्यांत येत असलेल्या तपासणीचा उल्लेख अपर मुख्य सचिवांनी केला. त्यांच्या कार्यक्षेत्रबद्दल व अनुभवाबद्दल अधिक माहिती द्यावी या मा.अध्यक्षमहोदयांच्या सूचनेनंतर मा. उपाध्यक्षांनी असे स्पष्ट केले की, त्यांनी मांडलेला मुद्दा वेगळा आहे.

येथे प्रमुख दोन बाबींवर चर्चा करणे गरजेचे आहे. पहिली बाब म्हणजे गुणवत्ता नियंत्रण, ज्यासाठी एक अधीक्षक अभियंता व 3 कार्यकारी अभियंता सध्या कार्यरत आहेत ते फक्त आलेल्या तक्रारींची दखल घेतात. पण योजनांची मोठया प्रमाणावर सर्वसाधारण अंमलबजावणी होत असते तेथे सर्वत्र भेट देऊन त्यावर यांचेकडून कार्यवाही होत असल्याचे दिसून येत नाही.

दुसरी बाब म्हणजे दक्षता पथकास स्वतंत्र अस्तित्व असणे आवश्यक आहे व म्हणून ते सदस्य सचिवांच्या थेट नियंत्रणाखाली असू नये तर ते थेट मंत्रीमहोदयांच्या वा सचिवांच्या नियंत्रणाखली असावे यावर त्यांनी भर दिला. अर्थात सदस्य सचिवांचा उल्लेख आपण वैयक्तिक स्वरुपांत करीत नसून पदाच्या संदर्भात करीत आहोत व कामाच्या हिताच्या दृष्टीने या दक्षता पथकास स्वतंत्र स्थान व महत्व असण्याच्या आवश्यकतेवर भर दिला.

"स्वैर ( सहजगत्या निवडलेला ) नमुना पहाणी" हा मुद्दा स्पष्ट करताना त्यांनी अशी सूचना केली की, जेवढया योजनांची अंमलबजावणी होत आहे त्यापैकी 20 ते 25 टक्के वा जी व्यावहारिक टक्केवारी ठरविणे शक्य आहे तेवढयापूरती राज्यभर सर्वत्र कामे चालू असलेल्या ठिकाणांना भेटी देऊन कामांची पहाणी करावी आणि शिवाय या संदर्भात ज्या तक्रारी आलेल्या आहेत त्यांचीही दखल घ्यावी.

सचिवांच्या थेट नियंत्रणाखाली दक्षता पथकाची जी यंत्रणा निर्माण करण्यांत येणार आहे, त्यांनी जिल्हापरिषदेद्वारे हाती घेण्यांत आलेल्या कामांचीही पाहणी करावी अशी सूचना सदस्य, श्री.सुरेश पटवर्धन यांनी केली. ही सूचना सर्वानुमते मान्य झाली. मात्र त्रयस्थ यंत्रणेकडून पाहणी करणे ही एक स्वतंत्र बाब आहे हेही त्यांनी स्पष्ट केले.

....10...

प्रधान सचिव, वित्त विभाग यांनी असा मुद्दा उपस्थित केला की,भरारी पथकासह दक्षता पथकाची ही यंत्रणा निर्माण करण्यासाठी जर नवीन पदे निर्माण करावयाची असतील तर त्यास शासनाची पूर्वानुमती घ्यावी लागेल. अस्तित्वातील पदे वापरुन हे काम वापर होणार असेल तर यात काही अडचण येणार नाही. त्यावर मा.उपाध्यक्षांनी असे स्पष्ट केले की, किती पदे लागतील आणि त्यापैकी किती निर्माण करावी लागतील याचा विचार केला जाईल.

अपर मुख्य सचिवांनी असा मुद्दा स्पष्ट केला की, या ठिकाणी दोन बाबींवर विचार करण्यांत येत आहे.

पहिली बाब, भरारी पथकासह दक्षता पथक, प्रत्येक महसूल विभागासाठी एक या प्रमाणात निर्माण केले जाईल. हे पथक प्राप्त झालेल्या तक्रारीच्या संदर्भात कार्यवाही करील आणि त्याच बरोबर महा.जीवन प्राधिकरण तसेच जिल्हापरिषदेद्वारे ज्या योजनांची अंमलबजावणी होते त्यांना स्वैर नमुना पध्दतीने भेट देऊन त्या संदर्भात आवश्यक ती कार्यवाही करील.

दुसरी बाब म्हणजे कामाची गुणवत्ता राखणे, या बाबीचा उहापोह श्वेतपत्रिकेमध्ये करण्यांत आला असून त्रयस्थ यंत्रणेच्या माध्यमातून अंमलबजावणीची तपासणी करावयाचे ठरले आहे. या संदर्भात आपण अनेक वेळा सूचना दिलेल्या असूनही अद्याप प्रत्यक्ष कार्यवाही करण्यांत आलेली नाही. हे त्यांनी ध्यानात आणून दिले. या संदर्भात त्यांनी अशी सूचना केली की, सर्वसारणतः रु.एक कोटीहून जास्त किंमतीच्या योजना असतील.तर तिथे वर्षातून दोनवेळा भेट देऊन आपला अहवाल सादर करावा, तर त्याहून जास्त किंमतीच्या योजनांच्या संदर्भात दर 5 किंवा 10 योजनांमागे, एक योजना निवडून त्यांना त्रयस्थ यंत्रणांनी भेटी देऊन कार्यवाही करावी. त्रयस्थ यंत्रणांकडून जी पाहणी केली जाईल त्यामध्ये काम कसे चालू आहे त्यावर करण्यांत येणारी देखरेख उचित आहे काय, या संदर्भात ठेकेदारांनी आपली जबाबदारी पाळली आहे काय , त्यांचेवर पुरेसे नियंत्रण तेवले आहे किंवा नाही या सर्व गोष्टींचा अहवाल त्रयस्थ यंत्रणेच्या तपासणीमध्ये देण्याची पध्दत घालून देण्यांत यावी.

चर्चेअखेरीस मा.उपाध्यक्षांनी अशी सूचना केली की, दक्षता पथकाची निर्मिती , त्यातील भरारी पथकाचे अस्तित्व, त्याची संरचना, स्वरुप व कार्यपध्दती तसेच त्रयस्थ यंत्रणेच्या माध्यमातून योजनांना भेट देऊन गुणवत्ता टिकवणे या दोन बाबींवर अपर मुख्य सचिवांनी लवकरात लवकर एक सविस्तर व स्वयंस्पष्ट टिप्पणी मा.मंत्रीमहोदयांकडे मान्यतेसाठी सादर करावी.

**कार्यक्रम बाब क्र.6 : (78 व्या सभेतील) : सावदा वाढीव पाणी पुरवठा योजना – आवक विहिर, जोड पाईपलाईन, पंपगृह, उध्दरण विहिर व 273 मि.मि.व्यासाची पोलादी पाईपाची उध्दरण नलिका, विद्याची अशुध्द व शुध्द पाण्याची उर्ध्ववाहिनी.**

या संदर्भात "कार्यवाही चालू आहे" असा जो उल्लेख केलेला आहे त्या संदर्भात नाशिकच्या मुख्य अभियंत्यांनी अशी माहिती दिली की, विहीर खोदण्यांत आली असून बांधकाम सुरु करण्यांत आले आहे व पाईप लाईनचे काम सुरु करण्यांत आले असून 4 कि.मी. पूरती खोदाई झालेली आहे. याहून जास्त खोदाई होऊ शकली असती परंतू जेवढी खोदाई झालेली आहे तेवढयापुरती पाईप लाईन टाकण्यांचे काम आधी पूर्ण करावे अशा सूचना त्यांनी दिलेल्या आहेत.

**कार्यक्रम बाब क्र.7 (78 व्या सभेतील) : ग्रामीण पाणी पुरवठा योजनांतर्गत यांत्रिकी व विद्युतसंबंधी कामांच्या निविदा स्वतंत्रपणे मागविण्याबाबत.**

1) या संदर्भातील कार्यवाहीबाबत जो उल्लेख आहे तो बरोबर वाटत नाही असा मुद्दा मांडण्यांत आला. जे परिपत्रक काढण्यांत आले आहे असे म्हटले आहे त्याची प्रत या कार्यक्रम बाबीबरोबर जोडण्याची आवश्यकता होती, असे सदस्य श्री.पटवर्धन यांनी मत व्यक्त केले. यावर सदस्य सचिव यांनी सांगितले की, मूळात ही बाब व मागच्या बैठकीत चर्चीली केली गेली नव्हती. त्यामुळे इथे हा उल्लेख चूकीचा आहे.

2) यांत्रिकी व विद्युत कामासाठी स्वतंत्रपणे निविदा मागविण्याच्या संदर्भात एक कार्यक्रम बाब सादर करावी असे गेल्या बैठकीत ठरले होते. ही बाब पुढील बैठकीच्या वेळी सादर करावी असे ठरले.

3) पुण्याच्या मुख्य अभियंत्यांनी जी आदर्श (मॉडेल) निविदा पुस्तके तयार केलेली आहेत,ती सर्व विभागातील क्षेत्रिय अधिका–यांना उपलब्ध करुन देण्यांत आली आहेत काय या श्री.सुरेश पटवर्धन यांच्या विचारणेवर होकारार्थी उत्तर दिले गेले.
ठरले.

योजनांच्या हस्तांतरणासंदर्भात एक स्वतंत्र बैठक घ्यावयाची ठरले आहे त्यानुसार कार्यवाही करण्याच्या आवश्यकतेवर श्री. सुरेश पटवर्धन यानी भर दिला.

श्री.सुरेश पटवर्धन यांनी असेही ध्यानात आणून दिले की गेल्या बैठकीत त्यांनी पाण्याची गळती शोधून त्याचे नियमन करण्याच्या संदर्भात जो मुद्दा उपस्थित केला होता त्याबाबत त्यांना देण्यांत आलेल्या माहितीनुसार एका प्रस्तावास राज्य सरकारकडून प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. तथापि हा प्रस्ताव मुख्यतः प्रशिक्षणाच्या दृष्टीकोनातून तयार करण्यांत आला आहे. त्यासाठी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे काय हे तपासून पाऊले उचलण्यांत यावीत.

याशिवाय गळती प्रतिबंधाच्या संदर्भात केवळ प्रशिक्षण देणे पुरेसे नसून काही निवडक शहरात प्रत्यक्षात असे काम करुन त्यातून काय अनुभव मिळतो हे पहावे अशी सूचना त्यांनी केली होती. तेंव्हा आता त्यासाठी एक स्वतंत्र प्रस्ताव शासनास पाठविण्यांत यावा व त्यासाठी अर्थसंकल्पीय तरतूद करावी अशी त्यांनी सूचना केली.

वरील चर्चेनंतर प्राधिकरणाच्या 78 व्या बैठकीत घेतलेल्या निर्णयावर करण्यांत आलेल्या कृतीबद्दलच्या कार्यक्रम बाबीवरील चर्चा पूर्ण झाली.

**कार्यक्रम बाब क्र.3 :बारागाव नांदूर व इतर 14 गावांची प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजना, ता–राहुरी,जि–अहमदनगर.**

**इंटेक चॅनेल,जॅकवेल व पंपगृह, अप्रोच ब्रीज, उर्ध्ववाहिनी,जलशुध्दीकरण केंद्र,पंपींग मशिनरी,साठवण टाकी, शुध्द पाण्याची गुरुत्ववाहीनी, उंच टाकी,वितरण व्यवस्था, व इतर किरकोळ कामे इत्यादी कामांच्या निविदा स्वीकृतीबाबत.**

नाशिकच्या मुख्य अभियंत्यांनी या कार्यक्रम बाबीतील प्रमुख बाबी विषद केल्या. त्यांनी असाही उल्लेख केला की, कामाची निकड ध्यानांत घेता, मा.अध्यक्ष महोदयांच्या अनुमतीने कामास सुरुवातही

करण्यांत आली आहे. मे.लक्ष्मी इंजिनिअरींग , कोल्हापूर यांची 11.80 टक्के जास्त दराची जी निविदा प्राप्त झाली होती, ती सध्याच्या दराने अंदाजित किंमतीच्या तुलनेने किती जास्त वा कमी असेल अशी विचारणा मा.अध्यक्षांनी केली. त्यावर नाशिकच्या मुख्य अभियंत्यांनी माहिती दिली की, ढोबळ मानाने असे म्हणता येईल की, मे.लक्ष्मी इंजिनिअरींग , कोल्हापूरने भरलेले दर व सध्याच्या दराने येणारी किंमत ही जवळपास सारखीच (ऑन पार) असण्याची शक्यता आहे.

सदस्य श्री.माधव कुलकर्णी यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, या कामाची मुदत 2 वर्षे आहे व या कार्यक्रम बाबीमध्ये म्हटल्याप्रमाणे मे.पेट्रॉन सिव्हील इंजिनियरींग कंपनी यांची निविदा रु.12.92.62.252/— या रकमेस मंजूर केल्यावर काम पूर्ण होईपर्यंत एकूण खर्च तेवढाचं राहील, का, भाववाढीपोटी पुन्हा अधिक पैसे द्यावे लागतील अशी त्यांनी विचारणा केली. मा.अध्यक्षांनी त्यावर अशी सूचना केली की, भाववाढीपोटी द्यावयाच्या रकमेबाबतचा जो मुद्दा इतिवृत्त मंजूर करण्याच्या वेळी उपस्थित करण्यांत आला होता, त्यावर आता चर्चा करण्यांत यावी.

सदस्य श्री.माधव कुलकर्णी यांनी विचारणा केल्यावर नाशिकच्या मुख्य अभियंत्यांनी असा खुलासा केला की, नियमानुसार भाववाढीपोटी रकम द्यावी लागणार आहे.

या ठिकाणी असा एक मुद्दा मांडला गेला की, सर्वात कमी किंमतीची निविदा स्वीकारली जावो वा त्याहून जास्त किंमतीची निविदा स्वीकारली जावो, दोन्ही प्रकरणी भाववाढीपोटी रकम द्यावीच लागते. असे जर असेल तर निविदा भरण्याबाबत स्पर्धा राहते कुठे, असा श्री. माधव कुलकर्णी यांनी प्रश्न विचारला.

सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी असे ध्यानांत आणून दिले की, शासकीय नियमानुसार व कंत्राटात समाविष्ट करण्यांत आलेल्या अटींच्या आधीन राहून सध्या भाववाढीपोटी रकम देण्याची जी पध्दत आहे, ती बंद करावयाची झाल्यास त्याबाबत शासनास कळवावे लागेल.

मा.उपाध्यक्षांनी असा विचार मांडला की, आता आपण फार मोठया प्रमाणावर कामांच्या निविदा काढलेल्या आहेत. निविदा काढतांना कंत्राटदार जे दर भरतात, त्यांची, मंजूर योजनेतील तरतुदींशी तुलना करुन निविदा स्वीकारण्यांत येतात. तरीही पुढे जर भाववाढीपोटी तरतुदीप्रमाणे रकम द्यावी लागणार असेल तर योजनेचा खर्च वाढेल पण त्यामुळे किती बोजा वाढेल हे आताच सांगता येणार नाही. मग अशा प्रकरणी कोकण रेल्वेमध्ये जी पध्दत अवलंबविण्यांत आली त्यानुसार संपूर्ण व योग्य विचार करुन सर्वप्रथम कामाची वाजवी मुदत ठरविण्यांत यावी. त्याबाबत नंतर कोणत्याही अडचणीचा मुद्दा उपस्थित केला जाऊ नये. एकदा ती मुदत ठरविण्यांत आल्यावर कोणत्याही परिस्थितीत कंत्राटदारांना मुदतवाढ देण्यांत येऊ नये. या दोन्ही गोष्टी मान्य करुन कंत्राटदार त्याला जो काही दर परवडेल तो भरेल त्यावर प्राधिकरणाने नियमानुसार जो काही निर्णय घ्यावयाचा आहे तो घ्यावा, पण यापुढे भाववाढीपोटी अधिक तरतूद देण्याची पध्दत संपूर्णपणे बंद करण्याची आवश्यकता आहे. नाहीतर खर्चावर बंधन राहणार नाही आणि खर्च कुठल्याकुठे जाईल.

सदस्य श्री.पडळकर यांनी, पूर्वीही भाववाढीपोटी रकम देण्यात येत असे, कां, नंतर ही पध्दत अंमलात आणली अशी विचारणा केली. त्यावर, ही पध्दत 1980 नंतर अंमलात आलेली आहे असे सांगण्यांत आले.

मा.उपाध्यक्षांनी आणखी एका महत्वाच्या मुद्यावर भर दिला. निविदा काढून झाल्यावर प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या वेळी एक्स्ट्रा आयटेम या नावाखाली जो खर्च केला जातो, त्याबाबत ब-याच तक्रारी आहेत, अशी त्यांची माहिती होती. हे एक्स्ट्रा आयटेम कोणत्याही रकमेपर्यंत मंजूर केले जाऊ शकतात, त्याला काही मर्यादा नाही. कारण तसे अधिकार आपण अधिका-यांना दिले आहेत. खोदाईमध्ये भूस्तराचा जो प्रत्यक्षांत प्रकार असतो त्याऐवजी, त्याला दुसरा दर्जा देण्याचा (मातीचा मुरुम वा मुरुमाचा खडक) व त्यानुसार कंत्राटदारांस देयके अदा करण्याची अनेक प्रकरणे आहेत. अनेक प्रकरणी अशाप्रकारे मूळ योजनेच्या खर्चात 25 ते 30 टक्के वाढ झाल्याची उदाहरणे आहेत.

भाववाढ व एक्स्ट्रा आयटेम या दोन्ही प्रकरणी संबंधितांना काळेबेरे करण्याची मोठया प्रमाणांवर संधी प्राप्त होऊ शकते व ती कशी थांबविता येईल यावर विचार करणे आवश्यक आहे. गुणवत्ता नियंत्रण पथकाव्दारे यावर नियंत्रण ठेवता येणे कठीण आहे. त्यांनी असाही अभिप्राय व्यक्त केला की, एका बाजूने सन 2000 सालापर्यंत योजना पूर्ण करण्यासाठी किती निधी लागेल अशी जी अपेक्षा आहे त्याचीच व्यवस्था कशी करावयाची याचा आपण सर्व काळजीपूर्वक विचार करीत असताना, जो काही निधी उपलब्ध केला जाईल तो जर वाढीव खर्चापोटी वापरला जाऊ लागला तर फार मोठी अडचण येईल.

अपर मुख्य सचिवांनी असा मुद्दा मांडला की, सुधारित योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबत सतत प्रस्ताव येत असतात ही चिंतेची बाब आहे. आणि म्हणून मूळ योजनेत योग्य प्रकारे तरतूदी केलेल्या नसतील, वा नंतर नवीन बाबी समाविष्ठ केल्या असतील तर आणि खर्च वाढत असेल तर, ज्यांनी अशा प्रकारे कामे केली त्यांना जाब विचारण्यासारखा गंभीर विचार प्राधिकरणाला करावा लागेल. यापूर्वीही हा मुद्दा शासनाने उपस्थित करुन पत्र व्यवहार केला होता पण त्याबाबत फारशी कांही कृती झालेली नाही.

वित्त विभागाच्या प्रधान सचिवांनी अशी माहिती दिली की त्यांच्या माहितीनुसार सुमारे 400 ग्रामीण योजनांची प्रकरणे सुधारित मान्यतेसाठी विचाराधीन आहेत. अनेक प्रकरणी तर सुधारित योजना शासनास सादर न करताही अधिक खर्च केला गेला आहे, आणि अशा प्रकारे शासनाच्या परवानगीविना शासनावर बोजा टाकणे गंभीर बाब आहे.

त्यावर मा.उपाध्यक्षांनी अशी सूचना केली की, कालबध्द कार्यक्रम हाती घेतला असताना दिलेल्या विशिष्ट मुदतीत कंत्राटदारांवर काम करण्याचे बंधन टाकले पाहिजे आणि त्याचे कठोरपणे व कणखरपणे पालन केले पाहिजे. कामाला उशीर केला की जोरदार दंड लावला पाहिजे व अन्य कारवाईही केली पाहिजे. त्या कामासाठी कंत्राटदाराला किती रक्कम द्यावयाची हे सुरुवातीस एकदा ठरले की, ती कायम राहिली पाहिजे व त्यासाठी कोणतीही वाढ देणे मान्य करावयाचे नाही यावर कटाक्ष असला पाहिजे. आज असा अनुभव आहे की, 500 लाख रुपये मूळ किंमतीवर 200 लाख रुपये वाढीव बोजा या ना त्या कारणाने पडत असतो, आणि हे सारे नियंत्रणाबाहेर जाते.

वित्त विभागाच्या प्रधान सचिवांनी अशी विचारणा केली की, भाववाढीपोटी आपण रक्कम अदा करीत असतो, पण डिझेलसारख्या काही वस्तुंच्या किंमती कमी होत आहेत हे ध्यानात घेतले जाते का? त्यावर खुलासा करण्यांत आला की, निर्देशांक कमी झाला तर त्यानुसार कपात करण्याच्या अटीचा निविदेत समावेश असतो.

अपर मुख्य सचिवांनी अशी सूचना केली की, कोकण रेल्वे अधिका-यांना प्राधिकरणाच्या अधिका-यांनी समक्ष भेटून त्यांचेकडून माहिती घ्यावी. योजनेस येणा-या खर्चाचा अंदाज बिनचूकरित्या

कसा काढला जातो, कोणती काळजी घेतली जाते, कामाची मुदत ठरविण्यासंदर्भात काय काळजी घेतली जाते, भाववाढ होत असतानाही जर कंत्राटदारास वाढीव रक्कम देण्याची प्रथा त्यांच्याकडे नसेल तर वाढीव खर्च सहन करण्याच्या दृष्टीने त्यांच्याकडे काय केले जाते हे सर्व तातडीने आपण जाणून घेतले पाहिजे व त्यानुसार कृती केली पाहिजे. या सर्वांबाबत जर आपण अधिक काळजीपूर्वक व आवश्यक त्या गांभीर्याने विचार करुन कार्यवाही केली नाही तर हा कार्यक्रम सन 2000 सालापर्यंत पूर्ण करणे शक्य होणार नाही.

वित्त विभागाच्या प्रधान सचिवांनी अशीही सूचना केली की, कार्यक्रमाची आखणी, योजनांची अंमलबजावणी या संदर्भात व्यवस्थापनाचे नवीन प्रकार हाताळणे आवश्यक असून त्या दृष्टीने पर्टचार्टचा प्रभावी वापर केला गेला पाहिजे. या मुद्याची उपयुक्तता ध्यानात घेऊन मा.उपाध्यक्षांनी अशी सूचना केली की, प्रत्येक कार्यकारी अभियंत्याच्या कार्यालयामध्ये लहानसहान योजना वगळता मोठया योजनांसाठी असा पर्टचार्ट लावला पाहिजे व त्या त्या कार्यकारी अभियंत्यांनी त्यानुसार कामाकडे लक्ष दिल पाहिजे व ते लक्ष देतात किंवा नाही त्याबाबत वरिष्ठांनी लक्ष दिले पाहिजे.

सदस्य श्री.माधव कुलकर्णी यांनी आणखी एक मुद्दा उपस्थित केला की, प्राधिकरणाच्या अभियंत्यांनी कामाची जी किंमत ठरविलेली असते त्याहून कमी दराची निविदा कंत्राटदार भरतात याचा अर्थ काय ? त्यावर मा.अध्यक्ष महोदयांनी असे स्पष्ट केले की, निविदेसाठी कंत्राटदार जो काही दर भरतात तो त्यांच्या स्वतःचा प्रश्न आहे. सर्व गोष्टी ध्यानात घेऊन हा दर ते भरतात असे गृहित धरलेले असते. पण मग कमी दराची निविदा भरली जात असेल तर कामाची गुणवत्ता धोक्यात येण्याची शक्यता आहे काय या श्री.माधव कुलकर्णी या सदस्यांच्या विचारणेवर मा.उपाध्यक्षांनी हा मुद्दा जरुर उपस्थित होऊ शकतो असे आपले मत मांडले.

वित्त विभागाच्या प्रधान सचिवांनी मात्र असे ध्यानात आणून दिले की, योजनेची जी काही अंदाजित किंमत ठरविली जाते व कंत्राटदार जे दर भरतात त्यामध्ये त्याला किमान 10 टक्के नफा होईल असे गृहीत धरलेले असते. तथापि ज्या कंत्राटदारांकडे एकाहून जास्त कामे असतात किंवा जे मोठे कंत्राटदार असतात त्यांना यावरचा ओव्हरहेडचा खर्च कमी करता येणे शक्य असते व म्हणून ते कमी दर भरण्याची शक्यता असते हे विचारात घ्यावे.

या चर्चेनंतर ही कार्यक्रम बाब मंजूर करण्याचे ठरले व पुढीलप्रमाणे ठराव मंजूर करण्यांत आला.

<u>ठराव :–</u>

"बारागांव नांदूर व इतर 14 गावांची प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना, ता.राहुरी, जिल्हा–अहमदनगर योजनेतर्गत उद्भव, उर्ध्ववाहिनी, जलशुध्दीकरण केंद्र, पंपींग मशिनरी साठवण टाकी, गुरुत्ववाहिनी, उंच टाकी, वितरण व्यवस्था व इतर कामांसाठी मे.पेट्रॉन सिव्हील इंजिनिअरींग लि., मुंबई यांची 4.12 टक्के कमी दराची म्हणजेच रु. 12,92,62,252/–ची सर्वात कमी किंमतीची निविदा मंजूर करण्यांत येत आहे.

सदर निविदा स्वीकृत करुन प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यासाठी करावी लागणारी कार्यवाही करण्याचे अधिकार सदस्य सचिव ( तांत्रिक ) यांना देण्यात येत आहेत."

**कार्यक्रम बाब क्र.4:–जेऊर व 29 गावांची प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना,तालुका–करमाळा,जि– सोलापूर.**

पुण्याच्या मुख्य अभियंत्यांनी कार्यक्रम बाबीतील महत्वाच्या बाबी विषद केल्या. त्यांनी असेही स्पष्ट केले की, एकाच वेळी 3 निविदा उघडण्यांत आल्या होत्या आणि त्या संदर्भात प्राधिकरणाची इसारा रकमेपोटी सूट देण्याबद्दल दाखला देण्याची जी पध्दत आहे त्याहून वेगळी अशी पध्दत अवलंबविलेली होती. तीन्ही निविदा मिळून जेवढी इसारा रक्कम भरावयाची आहे त्यापैकी दाखल्यात उल्लेख केलेली रक्कम वजा करण्यांत येईल व 3 निविदा मिळून उर्वरित इसारा रक्कम संबंधित निविदेसोबत योग्य प्रकारे भरली नसेल तर, त्यांचे देकार विचारात घेतले जाणार नाहीत हे स्पष्ट करण्यांत आले होते असे त्यांनी ध्यानांत आणून दिले. मे.पेट्रॉन यांना ही अट मान्य नव्हती म्हणून त्यांची निविदा सर्वात कमी दराची असूनही स्वीकारता आली नाही हेही त्यांनी स्पष्ट केले.

सदस्य श्री.सुरेश पटवर्धन यांनी असा अभिप्राय व्यक्त केला की, जी पध्दत सध्या अस्तित्वात आहे त्यातील अडचणी ध्यानांत घेता त्यांत काही बदल करावयाचे असतील तर ते करावयास हरकत नाही, पण जे काही धोरण ठरेल ते सर्वसाधारणपणे ठरविण्यांत यावे आणि एकदा धोरण ठरले की, सर्वत्र त्याचे पालन केले गेले पाहिजे. यावर मा.मंत्रीमहोदयांनी अशी सूचना केली की, अपर मुख्य सचिव व कोकण विभागाचे मुख्य अभियंता श्री.अरमाळ व आवश्यक तर आणखी दोघे यांनी एकत्र बसून यावर काय करता येईल हे ठरवावे.

सध्या फार मोठ्या प्रमाणावर निविदा स्वीकारण्यांत येत असून सध्या जे नियम अस्तित्वात आहेत ते बाजूला सारुन व घाईघाईने काही कार्यवाही झाली तर त्यामध्ये निष्कारण अडचणी निर्माण होतील, ज्या टाळल्या गेल्या पाहिजेत. वरील प्रमाणे चर्चा झाल्यावर कार्यक्रम बाब मंजूर करण्यांत आली व पुढील प्रमाणे ठराव मंजूर करण्यांत आला.

**ठराव :**

"जेऊर आणि इतर 29 गावांसाठी असलेल्या पाणी पुरवठा योजनेअंतर्गतच्या सर्व कामांच्या एकत्रित निविदेसाठी मे.जयहिंद कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड, पुणे यांचा कमित कमी असलेला 8.18 टक्के कमी असलेला म्हणजेच रु.11,76,85,602/– (अक्षरी रुपये एकरा कोटी शहात्तर लाख पंच्याऐंशी हजार सहाशे दोन फक्त ) किंमतीचा आणि चालू दरसूची पेक्षा 13.63 टक्के कमी किंमतीचा प्रतिसादात्मक व तुलनात्मकदृष्टया योग्य असलेला देकार स्वीकारण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

या प्रकरणी पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यास प्राधिकरणाच्या सदस्य सचिव ( तांत्रिक ) यांना प्राधिकृत करण्यांत येत आहे."

**कार्यक्रम बाब क्र.5 : गांधीनगर व 11 गावांची प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना, तालुका करवीर.**

पुण्याच्या मुख्य अभियंत्यांनी याबाबत माहिती दिली की, या आधी मंजूर केलेल्या कार्यक्रम बाब क्र. 4 प्रमाणे हे प्रकरण आहे.

सदस्य श्री.सुरेश पटवर्धन यांनी असे ध्यानात आणून दिले की, कामे लवकर व्हावीत हा उद्देश डोळयासमोर ठेवून मुळातच निविदा सादर करण्याची मुदत कमी करण्यात आली आहे. अशा परिस्थितीत जी निविदा 19.2.98 ला उघडण्यांत आली, ती स्वीकृतीसाठी आज 3 महिन्यानंतर सादर होत आहे, हे योग्य नाही. कामे लवकर व्हावीत, त्यासंबंधी येणा–या प्रश्नांचे निराकरण करावे हे ध्यानात घेऊन शासनाने व प्राधिकरणाने जो काही निर्णय घेतलेला आहे, त्याचा हेतू व गांभीर्य ध्यानात घेवून निविदांवर संस्कार करुन त्या मान्य करण्याबाबतची कार्यवाही सर्व स्तरावर अविलंब होणे गरजेचे आहे. त्यांनी अशी मागणी केली की प्रस्तुत प्रकरणी निविदा केंव्हा सादर झाल्या व त्याबाबतचे टप्पे फ्लो चार्टच्या माध्यमातून दर्शविण्यांत यावेत, म्हणजे त्याबाबत उशीर कुठे व केंव्हा झाला इकडे लक्ष देता येईल.

मा.उपाध्यक्षांनी सुचविले की, याआधी मा. मंत्री महोदयांनी केलेल्या सूचनेनुसार अपर मुख्य सचिव व काही मुख्य अभियंता हे चर्चा करुन ज्या काही बाबी ठरविणार आहेत, त्यामध्ये या बाबीचा समावेश करावा. निविदा स्वीकारण्यासाठी एकूण जास्तीत जास्त किती कालावधीचे बंधन घालावयाचे ते ठरवावे अशी त्यांनी सूचना केली. बैठकीस हजर असलेल्या मुख्यमंत्र्यांचे याबाबत काय मत आहे अशी मा.उपाध्यक्षांनी विचारणा केली. ही मुदत एक महिना ठेवावी असे श्री.सुरेश पटवर्धन, सदस्य यांनी सूचना केली. सर्वसाधारण परिस्थितीत ही कालमर्यादा पाळता येईल असे मत मुख्य अभियंत्यांनी व्यक्त केले.

क्र.3च्या कार्यक्रमबाबीचे वेळी निविदा स्वीकारणे संदर्भात माहितीचा जो तक्ता दिलेला आहे, तशाच तक्त्यामध्ये या निविदेबाबतचीही माहिती असावयास हवी होती असे मत व्यक्त करुन यापुढे प्राधिकरणापुढे निविदा सादर करताना ही माहिती देण्याबाबत क्षेत्रीय अधिका–यांना द्याव्यांत असे मा.मंत्री महोदयांनी आदेश दिले.

त्यावर मा.मंत्री महोदयांनी असा अभिप्राय व्यक्त केला की, मोठया कंत्राटदारांनी आपली कामे (प्राधिकरणाच्या अधिका–यांच्या पूर्वानुमताने ) लहान कंत्राटदारांवर सोपविणे हे नेहमीचेच आहे. , त्या बदल करणे व्यावहारिकदृष्टया कठीण आहे. तथापि सदस्यांनी जी परिस्थिती वर्णन केली, भावना व्यक्त केल्या त्या संदर्भात काय करता येईल, हे पाहून आवश्यक त्या सूचना देण्याबाबत कार्यवाही करण्यांत येईल.

अशा ज्या बाबी असतात, उदाहणार्थ मोठे कंत्राटदार लहान कंत्राटदारांवर कामे सोपवतात, ती त्यांकडून ( वेळेवर ). होत नाहीत, विलंब होतो, त्याबाबींचा कंत्राटदारांच्या कामकाजाबाबत गोपनीय अहवालामध्ये उल्लेख केलेला असतो की नाही हे पाहिले जावे अशी सूचना अपर मुख्य सचिवांनी केली, मा. उपाध्यक्षांनी असा मुद्दा मांडला की एखादा मोठा कंत्राटदार नागपूर मध्ये काम घेईल, नाशिकमध्ये काम घेईल, अमरावतीमध्ये काम घेईल व पुणे येथेही काम घेईल, या सर्व ठिकाणी या कामातून फायदा करुन घेणे हाच त्याचा मुख्य हेतू असतो व त्यादृष्टीनेच ते काम करीत असतात. आपल्या कार्यक्रमांत सहभागी होऊन, समरस होऊन आपल्या गरजेनुसार कामे वेळचेवेळी पूर्ण करणे हे त्यांचे उदि्दष्ट असतेच असे नाही. तेव्हा त्यादृष्टीने कंत्राटदारांवर किती कामे सोपविण्यांत यावीत हे ठरविले जावे. सदस्य सचिव ( बीडींग कपॅसिटी ) ठरविली असल्याने याबाबत निश्चितपणे फरक पडू शकेल. हे जे ठरविण्यांत आले आहे त्याबाबत नाशिकच्या मुख्य अभियंत्यांनी माहिती दिली की, प्रस्तावित कंत्राटाचा कालावधी किती आहे, यापूर्वी गेल्या 5 वर्षात त्यांनी वर्षात जास्तीत जास्त किती किंमतीचे काम केले तसेच सध्या त्यांच्या हातांत असलेल्या कामांची एकूण किंमती किती या सर्वांचा विचार होतो. हे ठरवताना शासनामध्ये पूर्वी गुणक–2 वापरला जात होती त्याऐवजी आता प्राधिकरणामध्ये गुणक–3 ठरविण्याबद्दल स्पष्टीकरणही

दिले,जेणेकरुन प्राधिकरणामध्ये कंत्राटदार एकूण जास्त किंमतीच्या कामासाठी निविदा भरु शकतील. असा बदल न केल्यास आवश्यक त्या प्रमाणात कंत्राटदार उपलब्ध होणार नाहीत, या सदस्य सचिव(तांत्रिक) यांच्या अभिप्रायास मात्र मा.उपाध्यक्षांनी असहमती दर्शविली.

सदस्य श्री.माधव कुलकर्णी यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, लार्सन ॲन्ड टूब्रो सारखी मोठी कंपनी, जिची वार्षिक उलाढाल 500 कोटी रुपयांची असेल ती अनेक ठिकाणी कामे घेऊ शकेल व त्यामुळे अडचणींची परिस्थिती निर्माण होते. मा. मंत्रीमहोदयांनी असा अभिप्राय व्यक्त केला की, सदस्य श्री.सुरेश पटवर्धन यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे, त्या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्यांत यावा. त्यांनी असेही आदेश दिले की, पाणी पुरवठयाचा हा कार्यक्रम 2000 सालापर्यंत पूर्ण करावयाचा आहे व त्यासाठी सर्व संबधितांनी कठोर परिश्रम करुन आपापली जबाबदारी उचलली पाहिजे. अशा परिस्थितीत एकाच कंत्राटदाराकडे जास्त कामे सोपविण्यांत आली तर तयातील अनेक कामे अर्धवट राहून 2000 सालापर्यंत कार्यक्रम पूर्ण करण्याचा हेतू तडीस जाणे अशक्य होईल.

या संदर्भात त्यांनी असाही उल्लेख केला की, अलिकडे ज्या कामाच्या निविदा स्वीकारल्या जात आहेत, त्यामध्ये महाराष्ट्रातील ठेकेदार मागे पडत आहेत. त्या मानाने इतर प्रांतातील, खास करुन आंध्रप्रदेशातील ठेकेदार मोठया प्रमाणात येत आहेत. कृष्णाखोरे विकास महामंडळाच्या बाबतीत अशी टीका मोठया प्रमाणात करण्यांत आली होती, त्याचीही दखल घेण्यांत यावी. या संदर्भात त्यांनी असाही विचार मांडला की, महाराष्ट्रात सुमारे 27000 गावांसाठी योजना पूर्ण करावयाच्या आहेत व ढोबळ मानाने 11000 योजना असतील असे गृहित धरले व एका कंत्राटदारास दोन योजनांची कामे दिली तर 5500 कंत्राटदार लागतील व 3 योजना दिल्या तर सुमारे 3700 कंत्राटदार लागतील. एवढे कंत्राटदार उपलब्ध आहेत काय, याचाही विचार करावा लागेल.

मा.मंत्री महोदयांनी असाही वेगळा विचार मांडला की, संबंध जिल्हाची कामे एकत्र करुन एकच निविदा काढण्याचा विचार करता येण्याजोगा आहे का हे पहावे. या संदर्भात आंध्रातील पुट्टपूर्ती येथील सत्यसाईबाबा संस्थेच्या विद्यमानाने 700 गावांसाठी हाती घेण्यांत आलेली योजना लार्सन ॲन्ड टुब्रोने एका वर्षात पूर्ण केली. या मोठया कंपन्या असे प्रतिपादन करतात की, लहान स्वरुपाची अनेक कामे काढली तर त्याप्रमाणात निविदा भरणे, पुढील व्यवस्था करणे आदीबाबी खर्चिक व किचकट होतात. म्हणून त्याच्यात त्यांना रस नसतो. त्याऐवजी एका कंत्राटदारावर एका जिल्हयाची सर्व कामे सोपवावीत म्हणजे ती यशस्वीरित्या पूर्ण करुन दाखवू असे आव्हान त्यांनी स्वीकारले आहे. याच संदर्भात महराष्ट्राबाहेरील कंपन्या (उदा.दिल्लीची कंपनी) यांनीही प्रस्ताव पाठविलेला होता. तेंव्हा एकूण योजनांची संख्या, कंत्राटदाराची उपलब्धता, एका कंत्राटदारांवर किती काम सोपवावे याबाबत होत असलेला विचार या सर्व गोष्टी, 2000 साली संपूर्ण कार्यक्रम पूर्ण करण्याच्या संदर्भात विचारात घेऊन, सखोलपणे व सर्वांगीण विचार करुन निर्णय घेणे योग्य राहील.

सदस्य श्री.सुरेश पटवर्धन यांनी अशी माहिती दिली की, जागतिक बॅंकेच्या अर्थसहाय्याने जो प्रकल्प हाती घेतला, त्या संपूर्ण प्रकल्पासाठी ( राज्यस्तर) एकच कंत्राटदार यंत्रणा असावी असा त्यांचा आग्रह होता. तथापि त्या संदर्भात मंडळाला फारसा अनुभव नसल्याने व त्यातील संभाव्य अडचणींची कल्पना नसल्याने एवढया मोठया प्रमाणावर एकच कंत्राटदार न नेमता इतर काही जणांवर कामे सोपविण्याची भूमिका त्यावेळी घेण्यांत आली. तेंव्हा अनेक निविदांच्या रुपाने 100 कोटी रुपयांच्या आसपासच्या किंमतीची कामे एका कार्यकारी अभियंत्यावर सोपविणे हे व्यवस्थापनाच्या दृष्टीने शक्य व

परवडणारे होईल का असा त्यांचा मुद्या होता व तालुका हे एक परिमाण मानण्यांत यावा व तालुक्यापुरती सर्व कामे एकत्र करुन निविदा काढण्यांत यावी अशीही एक सूचना करण्यांत आली. त्या सूचनेला मा.उपाध्यक्षांनी दुजोरा दिला.

या संदर्भात सदस्य श्री.माधव कुलकर्णी यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, मोठया प्रमाणावर कामे हाती घेणार असल्याकारणाने, लहान कंत्राटदार मोठया प्रमाणावर उपलब्ध व्हावे म्हणून प्राधिकरणाने जे प्रयत्न आजवर केले, त्यांना प्राधिकरणाचे रजिस्ट्रेशन दिले व आता एका मोठया समुहातील काम मोठया कंत्राटदाराला देणार असू तर आता लहान कंत्राटदारांचे रजिस्ट्रेशन रद्द करणे श्रेयस्कर राहील. त्यावर मा.उपाध्यक्षांनी असा अभिप्राय व्यक्त केला की, लहान कंत्राटदारांचा प्रश्न सोडविणे हा आज आपल्यापुढील प्रमुख प्रश्न नसून आपण जो मोठा कार्यक्रम हाती घेतलेला आहे, ती सर्व कामे वेळेवर पूर्ण होणे, एवढेच नव्हेतर ती कामे दर्जेदार असणे व अशा प्रकारे शासनाने हाती घेतेलेल्या कार्यक्रमाची पूर्तता होणे यास सर्वाधिक महत्व देणे अगत्याचे आहे.

या सर्व चर्चेच्या संदर्भात सदस्य सचिव (तांत्रिक) यांनी एक बाब ध्यानात आणून दिली की, या संदर्भात आपण आता जो निर्णय घेऊ, तो अंमलात आणण्यापूर्वीच ब-याचशा निविदा मागविल्या गेल्या असतील, तर त्या या आधी ठरल्याप्रमाणे स्वीकाराव्या लागतील.

मा.उपाध्यक्षांनी असाही विचार मांडला की, कामे वेळेवर पूर्ण होतात किंवा नाही, त्यांची गुणवत्ता चांगली रहाते किंवा नाही यावर कार्यक्रमाची यशस्विता व कार्यक्रमाच्या पूर्ततेस मिळणारी प्रशस्ती अवलंबून राहणार आहे.

या संदर्भात मुख्य अभियंत्यांचा अभिप्राय काय आहे, त्यांचा काय विचार आहे हे ही समजून घ्यावे अशी सदस्य सचिव (तांत्रिक ) यांनी सूचना केली.

सदस्य श्री.सुरेश पटवर्धन यांनी अशी विचारणा केली की, आता जो विचार होत आहे त्या संदर्भात शुध्दीपत्र काढणे किंवा स्थगन आदेश देणे यावर कार्यवाही होऊ शकेल का, हे पाहिले जावे, नाहीतर इकडे निर्णय घेण्याबाबत कार्यवाही होत राहील व तिकडे क्षेत्रीय स्तरावर निविदा स्वीकारल्या जातील. एकेका विभागीय कार्यालयास 100—200 निविदा हाताळणे, तेवढयाच संख्येतील कंत्राटदारांच्या बाबतीत लक्ष घालणे हे अत्यंत अवघड होईल आणि योग्य प्रकारे व्यवस्थापन होऊ शकणार नाही अशी शंका त्यांनी व्यक्त केली.

या संदर्भात नाशिकच्या मुख्य अभियंत्यांनी असा मुद्दा मांडला की, जागतिक बॅंकेच्या अर्थसहाय्याने जो प्रकल्प हाती घेण्यात आला, त्यामध्ये एका पॅकेजमधील कामासाठी जो कंत्राटदार निविदा भरत आहे, त्याला त्या पॅकेजमधील किमान दोन कामे स्वतः पूर्ण केल्याचा अनुभव हवा, अशी अट होती. या अशा मुद्दयाची पूर्तता आपण ज्या मोठया निविदा होऊ शकेल किंवा नाही हे पहावे.

सदस्य श्री.फडणवीस यांनी आपला अभिप्राय व्यक्त केला की, सध्याच्या बदललेल्या जमान्यात तांत्रिकदृष्टया अनुभव व तत्सम गोष्टी या ना त्या प्रकारे जमवून आणता येतील, त्यांत फारशी अडचण येऊ नये पण मोठया प्रकल्पाचे व्यवस्थापन व हाताळणी हे सर्वात महत्वाचे आहे व तिकडे लक्ष दिल्याच प्रस्तावित कार्यक्रम पूर्ण करता येईल. मा. उपाध्यक्षांनी त्यांच्या या अभिप्रायास दुजोरा दिला.

चर्चेचा समारोप करताना मा.मंत्रीमहोदयांनी असे जाहीर केले की, या कार्यक्रम बाबीच्या संदर्भात सदस्यांनी जे विविध मुद्दे उपस्थित केले आहेत त्यावर अधिक सविस्तरपणे चर्चा करणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने ते स्वतः, उपाध्यक्ष, सदस्य श्री.सुरेश पटवर्धन, सदस्य सचिव (तांत्रिक) हे एकत्र बसून प्राथमिक स्वरुपाची शिफारशी तयार करतील व प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत त्या सदस्यांपुढे मांडण्यांत येतील व ही सर्व कार्यवाही आठवडाभराच्या आंत केली जाईल. या चर्चेनंतर सदर कार्यक्रम बाब मंजूर करण्यांत आली.

ठराव :—

"गांधीनगर व इतर 11 गावांसाठी असलेल्या पाणी पुरवठा योजनेअंतर्गतच्या सर्व कामांच्या एकत्रित एक निविदेसाठी मे.शेत आणि सुरा इंजिनियर्स, पुणे यांच्या कमीत कमी असलेला 9.1 टक्के कमी असलेला म्हणजेच रु.12,57,40,515/— (अक्षरी रु.बारा कोटी सत्तावन्न लाख चाळीस हजार पाचशे पंधरा फक्त ) किंमतीचा आणि चालू दरसूची पेक्षा 18.02 टक्के कमी किंमतीचा प्रतिसादात्मक व तुलनात्मकदृष्ट्या योग्य असलेला देकार स्वीकारण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

या प्रकरणी पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यास प्राधिकरणाच्या सदस्य सचिव (तांत्रिक) यांना प्राधिकृत करण्यांत येत आहे."

**कार्यक्रम बाब क्र.6 :वाढीव छडवेल कोर्डे पाणी पुरवठा योजना, तालुका—साक्री,जि—धुळे.**

नाशिकच्या मुख्य अभियंत्यांनी कार्यक्रम बाबीतील माहिती विषद केली. ही कार्यक्रम बाब अंतिमतः प्राधिकरणास सादर करताना काही चुका राहून गेलेल्या आहेत, हे त्यांनी नजरेस आणले. पृष्ठ क्र.26 वर मुद्दा क्र4 (7) मध्ये दि.22/1/98 च्या ऐवजी दि.19/3/98 ही तारीख समजावी व 19/2/98 च्या जागी दि.24/3/98 ही तारीख ध्यानांत घ्यावी असे सुचविले. तसेच पृष्ठ क्र.28 वर क्र.8 च्या परिच्छेदात 5.15 टक्के कमी दराचे, ऐवजी 6.43 टक्के कमी दराचे असे वाचावे. त्याचप्रमाणे ठरावातील मसुदयात 17.50 टक्के जास्त दराची ऐवजी 18.72 टक्के जास्त दराचे हा बदल ध्यानांत घ्यावा. ( कार्यक्रम बाब क्र. 8, पृष्ठ क्र.34 मध्येही मे.पेट्रॉन इंजिनिअरींग यांच्या संदर्भात "5.41 टक्के जादा दराने" असा उल्लेख असावयास हवा होता असे सदस्य श्री.सुरेश पटवर्धन यांनी ध्यानांत आणून दिले.)

महत्वाच्या बाबतीत अशा काही चुका राहून गेल्यामुळे ही बाब पुन्हाः पुढील बैठकीत घेण्यात यावी अशी सूचना अपर मुख्य सचिवांनी केली. तथापि, वित्त विभागाच्या प्रधान सचिवांनी असे सुचविले की, काही ढोबळ चुका आहेत हे मान्य करुनही, त्यामुळे निविदा स्वीकारण्याच्या संदर्भात काही महत्वाचा फरक पडणार नसल्याने व निविदा स्वीकारण्यास विलंब लागू नये म्हणून ही कार्यक्रम बाब मंजुर करावी असे आपले मत व्यक्त केले. मा.मंत्री महोदयांनी अशी सूचना केली की, अशा सर्व महत्वांच्या बाबी व्यवस्थितपणे तपासणे गरजेचे आहे. वरच्या स्तरावर सुध्दा प्रूफ रिडींगच्या आवश्यकतेवर मा.मंत्री महोदयानी भर दिला. तरीही चुकांची जबाबदारी कोणाची हे पाहण्यावर अपर मुख्य सचिवांनी भर दिला. तथापि, सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी खुलासा केला की, मंत्री महोदयांनी बैठकीची वेळ ठरवून दिल्यानंतर फारच कमी वेळ होता व या सर्व निविदांची कार्यक्रम बाब 2—3 दिवसांत सादर करावी लागली म्हणून चुका राहून गेल्या असतील व यापुढे योग्य ती काळजी घेतली जाईल. या चर्चेनंतर कार्यक्रम बाब मंजुर करण्याचे ठरले व पुढील प्रमाणे ठराव करण्यात आला.

ठराव :–

"रुपये 5,85,18,076/– (अक्षरी रुपये पाच कोटी पंच्याऐंशी लाख अठरा हजार शहात्तर फक्त) किंमतीची मे.जयहिंद प्रॉजेक्टस् लि., पुणे हयांची कमीत कमी किंमतीची (अंदाजित किंमतीपेक्षा 18.72 टक्के जास्त दराची म्हणजे रु.5,85,18,076/–खर्चाची) प्रतिसादात्मक व तुलनात्मकदृष्टया योग्य असलेली निविदा स्वीकारण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

या प्रकरणी पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यास प्राधिकरणाच्या सदस्य सचिव (तांत्रिक) हयांना प्राधिकृत करण्यांत येत आहे."

**कार्यक्रम बाब क्र.7 : कडूस प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना, ता–खेड,जि–पुणे. योजनेतील समाविष्ठ सर्व कामांची एकत्रित एक निविदा....**

पुण्याच्या मुख्य अभियंत्यांनी कार्यक्रम बाबीतील माहिती विषद केली. या कार्यक्रम बाबीतील मुद्दे या आधीच्या कार्यक्रम बाबी प्रमाणेच होते आणि म्हणून कार्यक्रम बाब मंजुर करण्यात आली व पुढील प्रमाणे ठराव करण्यात आला.

ठराव :–

"रुपये 15,80,56,809/–(अक्षरी रुपये पंधरा कोटी ऐंशी लाख छपन्न हजार आठशे नऊ फक्त) किंमतीची मे.पेट्रॉन इंजिनियर्स, मुंबई हयांची कमीत कमी किंमतीची (अंदाजित किंमतीपेक्षा 5.15 टक्के कमी दराची म्हणजे रुपये 15,80,56,809/–खर्चाची) प्रतिसादात्मक व तुलनात्मकदृष्टया योग्य असलेली निविदा स्वीकारण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

या प्रकरणी पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यास प्राधिकरणाच्या सदस्य सचिव(तांत्रिक) हयांना प्राधिकृत करण्यांत येत आहे."

**कार्यक्रम बाब क्र.8 : माधवनगर प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना,तालुका–मिरज,जि. सांगली.**

कार्यक्रम बाबीतील महत्वाच्या बाबींबाबत पुण्याचे मुख्य अभियंत्यांनी माहिती दिली. कार्यक्रम बाबीवर चर्चा होताना असा मुद्दा मांडण्यात आला की, या व अशा अनेक निविदा महाराष्ट्राबाहेरील कंत्राटदारांवर सोपविण्यात येत आहेत. या उलट आपल्या कंत्राटदारांना महाराष्ट्राबाहेरील इतर राज्यामध्ये मज्जाव करण्यात येतो. हैद्राबादमधील एका निविदेत "त्या राज्याबाहेरील कंत्राटदारांना या कामाच्या निविदा भरता येणार नाहीत" अशी टीप असल्याचेही सदस्य श्री.माधव कुलकर्णी यांनी ध्यानांत आणून दिले. तेव्हा या संदर्भात राज्यातील कंत्राटदारांना कामाच्या किंमतीच्या टक्केवारीच्या काही प्रमाणात विशेष पसंती ( प्रेफरन्स) देता येईल काय यावरही विचार करण्यात यावा असे त्यांनी सुचविले. कामाच्या किंमतीच्या टक्केवारीच्या काही प्रमाणात विशेष पसंती ( प्रेफरन्स), देता येईल काय यावरही विचार करण्यात यावा असे त्यांनी सुचविले.

शासनातील बांधकाम विभाग व पाटबंधारे विभाग यामध्ये निविदा काढणे व स्विकारणे याबाबतची जी नियमावली आहे, त्याहून वेगळे असे काही धोरणात्मक निर्णय घेण्यात येत असतील तर त्यास राज्य मंत्री मंडळाची मंजूरी घ्यावी लागेल असे वित्त विभागाच्या प्रधान सचिवांनी सांगितले. तसे असल्यास व आवश्यक वाटल्यास ही बाब मंत्री मंडळापुढे ठेवण्यांत यावी अशी मा.उपाध्यक्षांनी भूमिका घेतली.

हैद्राबादच्या निविदांबाबत जो उल्लेख करण्यात आला, त्याबाबतची कागदपत्रे आपणास उपलब्ध करुन देण्यात यावीत. म्हणजे ही बाब केंद्र शासनाकडे उपस्थित करुन घटनात्मक बाबींचे उल्लंघन होत आहे किंवा कसे हे आपण तपासून घेऊ असे अपर मुख्य सचिवांनी सांगितले.

महाराष्ट्रात एवढे कंत्राटदार उपलब्ध होण्याची शक्यता नाही असा सदस्य श्री.सुरेश पटवर्धन यांनी अभिप्राय व्यक्त केल्यावर राज्यातील कंत्राटदारांना काही प्रमाणात तरी संरक्षण देण्याचे काही मूलगामी प्रयत्न व्हावे याचेशी आपण सहमत आहात की नाही या मा.उपाध्यक्षांच्या विचारणेवर सदस्य श्री. सुरेश पटवर्धन यांनी होकारार्थी उत्तर दिले. त्या अनुषंगाने "ज्या कंत्राटदारांचे रजिस्टर्ड मुख्यालय महाराष्ट्रात नाही" त्यांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या योजनांची कामे न देण्याचा विचार करण्यात यावा असा मुद्दा मा.उपाध्यक्षांनी मांडला.

या बरोबरच राज्य लघु उद्योग विकास मंडळाकडूनच पाईपांची खरेदी केली जावी असे जे बंधन आहे, त्याबाबतही चर्चा झाली. इतरत्र (राज्यात वा राज्याबाहेर) व मोठया व मध्यम उद्योजकांकडून पाईप आणि जर स्वस्तात मिळत असतील तर त्यांचेकडूनहि पाईपस् खरेदी करण्यास काय हरकत आहे, असे विचार मांडण्यात आले. त्यास पाठींबा देत मा.मंत्री महोदयांनी अशी जाणीव करुन दिली की, असे करावयाचे झाल्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास अधिक जबाबदारी उचलावी लागेल, प्राधिकरणाकडे स्वतःची प्रयोगशाळा निर्माण करावी लागेल, पाईप सामुग्रीची स्वतः चाचणी करण्याची व्यवस्था निर्माण करुन दयावी लागेल. तरच सध्याच्या धोरणापेक्षा वेगळा विचार करणे श्रेयस्कर राहील.

जावी असे बंधन उद्योग विभागाकडून पालण्यात आले आहे," जर कंत्राटदारांस आपण बाहेरुन पाईप आणण्याची परवानगी दिली असेल तर त्यांनी कोणाकडून पाईप घ्यावे हे बंधन का घालण्यात यावे, असा मुद्दा उपस्थित करण्यांत आला. ही बाब सुध्दा मंत्री मंडळापुढे नेण्यात यावी आणि महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाऐवजी महाराष्ट्रातील कोणत्याही कंपनीकडून (मग तो लघू उद्योग असो वा नसो) कंत्राटदारास पाईप विकत घेण्याची परवानगी देण्यात यावी अशी मा.उपाध्यक्षांनी सूचना केली.

या संदर्भात आपण एक प्रस्ताव तयार करुन, मा.मंत्री महोदयांना सादर करु असे अपर मुख्य सचिवांनी सांगितले. त्याच वेळी लघु उद्योग विकास महामंडळाच्या माध्यमातून विविध लघु उद्योग केंद्रांकडून जे पाईप खरेदी केले जातात, त्याच्या चाचणीची जबाबदारी लघु उद्योग विकास महामंडळ घेईल काय याबाबतही चौकशी करावी असे आदेश मा.मंत्री महोदयांनी अपर मुख्य सचिवांना दिले.

दरम्यान पृष्ठ क्र.34 वर, प्राप्त झालेल्या निविदांबाबत जी माहिती देण्यात आली आहे त्यामधे मे. पेट्रॉन इंजिनिअरींग या नावापुढे "5.41 टक्के जादा दराने" असा उल्लेख असावयास हवा हे ध्यानांत आणून देण्यांत आले.

चर्चेच्या अखेरीस मे.आय.व्ही.आर.कन्स्ट्रक्शन्स् लिमिटेड, हैद्राबाद यांची निविदा स्वीकारण्याचे ठरले आणि त्यानुसार पुढीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

**ठराव :–**

रु.9,50,06,583/– (अक्षरी रुपये नऊ कोटी पन्नास लाख सहा हजार पाचशे त्र्याऐंशी फक्त) किंमतीची मे.आय.व्ही.आर.कंन्स्ट्रक्शन लि.,हैद्राबाद हयांची कमीत कमी किंमतीची (अंदाजित किंमतीपेक्षा 5.90 टक्के कमी दराची म्हणजे रु.9.50,06,583/–खर्चाची) प्रतिसादात्मक व तुलनात्मकदृष्टया योग्य असलेली निविदा स्वीकारण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

[illegible] सदस्य सचिव (तांत्रिक) [illegible] प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र. 9:– दिनांक 15/9/94 चा महाराष्ट्र शासन निर्णय क्र.संकीर्ण–1094/प्र.क्र. 81/नवि–18 नुसार 8 कि.मी.अंतरापुढील उद्‌भवासाठी धुळे नगरपालिकेला वाढीव शासकीय अनुदानाचा खास बाब म्हणून फायदा मिळवून देणे.**

या संदर्भात नाशिकच्या मुख्य अभियंत्यांनी माहिती दिली. त्यांनी असे स्पष्ट केले की, धुळयाच्या मूळ पाणी पुरवठा योजनेच्या खर्चात वाढ होत जाऊन, या योजनेस दोन वेळा सुधरित मान्यता देण्याचा प्रश्न उद्‌भवला. मूळ 40 कोटी रुपये किंमतीची योजना वाढून आता 46 कोटी 81 लाख रुपये झालेली आहे. मूळ योजनेत शासनाकडून 9 कोटी, 33 लाख, 20 हजार रुपये अनुदान अपेक्षित होते. तर 3/5/8 कि.मी. पेक्षा जास्त अंतराहून पाणी आणण्यासाठी जो खर्च येतो, तो शासनाने अनुदान म्हणून खर्च करावयाचा या (योजनांचे काम सुरु झाल्यानंतर) शासनाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाचा फायदा पूर्वलक्षी प्रभावाने आपल्या योजनेस मिळावा अशी धुळे नगरपालिकेची मागणी आहे. तसे झाल्यास अनुदानाची रकम रु.26 कोटी, 21 लाख, 72 हजार एवढी होईल.

अपर मुख्य सचिवांनी ही कार्यक्रम बाब प्राधिकरणाच्या संचालक मंडळापुढे मांडण्याचे काय कारण आहे अशी विचारणा केली. एकूणच या प्रकरणी विचार होणे का आवश्यक आहे हे स्पष्ट करण्याच्या दृष्टीने सदस्य श्री.सुरेश पटवर्धन यांनी असा मुद्या मांडला की, त्यांनी स्वतः या योजनेचा सखोल अभ्यास केला होता. अशा योजनांसाठी करावयाचे वित्तीय नियोजन आणि योजना पूर्ण झाल्यानंतर ती चालविणेसाठी कर्जफेडीच्या हप्त्यांसह येणारा खर्च व हा खर्च भरुन काढण्यास लावावे लागणारे पाण्याचे दर, त्यांची व्यवहार्यता असा सर्व विचार केला होता. शासनाकडून मिळणारे अनुदान हे त्या नगरपालिकांचा वर्ग कोणता यावर ठरते. पण पाणी आणण्यासाठी किती खर्च येतो याच्याशी त्याचा काही संबंध नसतो. योजनेतून पाणी पुरवठा करण्याच्या संदर्भात जो आर्थिक बोजा येईल तो भरुन काढावयाचा झाला तर, फार मोठया प्रमाणावर दरवाढ करावी लागेल आणि हे शक्य होणार नाही. ही बाब तेंव्हाच्या मंत्री मंडळ उपसमितीला पटली आणि लांबवरुन पाणी आणण्यासाठी येणारा हा जो वाढीव खर्च आहे तो अनुदानाच्या रुपाने करण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला.

धुळे नगरपालिकेची मागणी मान्य करावयाची झाल्यास इतरही नगरपालिका असा दावा करु शकतात, हे ध्यानांत घेऊन धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा असे सुचविले गेले. तसेच धुळे नगरपालिकेची ही बाब मान्य करावयाची झाल्यास त्यांनी आधी योजना ताब्यात घेणे हे आवश्यक असावे असाही मुद्या मांडण्यात आला.

चर्चेच्या अखेरीस अपर मुख्य सचिवांनी असे ध्यानांत आणून दिले की, या बाबीवर प्राधिकरणाने विचार करण्याची काही आवश्यकता नाही. आजवर असा विचार कधी पाणी पुरवठा मंडळाच्या बैठकीत झालेला नाही. वित्तीय आकृतीबंध काय असावा, अनुदान किती देण्यात यावे या सर्व धोरणात्मक बाबी ठरविणे हे शासनाचे काम असून, शासन परिस्थितीनुसार वेळोवेळी निर्णय घेत असते. प्राधिकरणाने जर असा ठराव केला तर त्यामुळे शासनाची अडचणीची परिस्थिती होईल.

अशा प्रकारे चर्चा झाल्यानंतर मूळची ही मागणी धुळे नगरपालिकेची असल्यामुळे, धुळे नगरपालिकेने परस्पर शासनाकडे संपर्क साधावा असे अभिप्राय मा.मंत्री महोदयांनी व्यक्त केले.

अखेरीस ही कार्यक्रम बाब विचारात न घेण्याचे ठरले व कार्य क्रम बाब मागे घेण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.10 :महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास वळवाव्या लागणा-या निधीबाबत.**

वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी या कार्यक्रम बाबीतील महत्वाची माहिती विषद केली. त्यांनी असेही स्पष्ट केले की, थकबाकीच्या संदर्भात अनेक त-हेने उपाय-योजना करण्यात येत असल्या तरी, त्या अयशस्वी होतात तसेच, या नगरपालिकांना देय असणा-या अनुदानातून थकबाकीची वसूली गेली काही वर्षे होत असली तरी, एकूण येणे असणा-या रकमेच्या तुलनेने अनुदानातून होणारी कपात फारच कमी असल्याने प्रत्यक्षात काही फारसे निष्पन्न होत नाही. त्यामुळे, मंडळास प्राप्त झालेल्या निधीतून खूपशी रक्कम कर्जफेड, पाणी पुरवठा केंद्राची देखभाल अशा कारणांसाठी वळवावी लागली, त्याची माहिती पृष्ठ क्र.46 वर देण्यात आली आहे. नागरी स्थानिक संस्थांकडून 342.20 कोटी रुपये व ग्रामीण स्थानिक संस्थांकडून 104.91 कोटी रुपये मिळून एकूण 447.11 कोटी रुपये अशी प्रचंड रकम येणे बाकी आहे व त्याची वसुली होत नाही, असे त्यांनी दाखवून दिले.

सदस्य श्री.सुरेश पटवर्धन यांनी या विषयाचे गांभीर्य संचालक मंडळाच्या ध्यानांत आणून दिले. त्यांनी असे स्पष्ट केले की, पूर्वीच्या पाणी पुरवठा मंडळास गेली अनेक वर्षे सतावणारा असा हा प्रश्न आहे आणि आजवर या संदर्भात परिणामकारक अशी कृती न झाल्याने हा "न सुटणारा प्रश्न " झालेला आहे. विकास कामावर खर्च करण्यासाठी शासनाकडून वा अन्य वित्तीय संस्थांकडून जो निधी उपलब्ध करुन दिला जातो तो पूर्णतः कामांवर खर्च करता येत नाही कारण अशा त-हेने कर्जाची परतफेड करणे इत्यादी कामांसाठी तो वापरला जातो. परिणामी कामांवर परिणाम होतो व ती खोळंबतात.

या कार्यक्रम बाबीमध्ये ग्रामीण योजनांसाठी आयुर्विमा महामंडळाकडून घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीच्या संदर्भात 153 लाख रुपये व्याजाची रकम शासनाने प्राधिकरणास मंजूर केली नाही, असा एक उल्लेख आहे. प्रधान सचिव, वित्त विभाग, यांनी या संदर्भात शासनाकडून पूर्वानुमती का घेतली नाही अशी विचारणा केली. त्यावर वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी असा खुलासा केला की, ही बाब वेळोवेळी शासनाच्या नजरेस आणण्यात आली असून, या एकूणच परिस्थितीबद्दल शासनास संपूर्ण कल्पना आहे, किंबहुना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अशाच प्रकारे तग धरुन आहे(वाटचाल करीत आहे) या शब्दात सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी आधीच्या प्रतिपादनाला पुष्टी दिली.

वित्त विभागाच्या प्रधान सचिवांनी केलेल्या विचारणेचा रोख ध्यानांत घेऊन, सदस्य श्री.सुरे श पटवर्धन यांनी असेही लक्षांत आणून दिले की, या सर्व बाबीवर खर्च तर करावा लागतोच, पैसा तर वळवावा लागतोच पण तसे का केले असे विचारणारे मात्र आवश्यक ते काय केले पाहिजे व अशा रीतीने

...24...

कमी पडणारा निधी कशा प्रकारे उपलब्ध करुन दिला जाईल याबद्दल मात्र मार्गदर्शन करीत नाहीत. नागरी स्थानिक संस्था आयुर्विमा महामंडळाकडून जे कर्ज घेतात त्यास राज्य शासनाची हमी असते व त्यापोटी हमी शुल्कही वसूल करण्यात येते. तेंव्हा, या कर्जाच्या पोटी दिलेली हमी आवाहन करुन कार्यान्वित (इनव्होक) करावी लागेल अशी त्यांनी सूचना केली.

जरुर पडल्यास असे करावे लागणार हे मान्य करुनही वित्त विभागाच्या प्रधान सचिवांनी यातील गांर्भीय ध्यानांत आणून दिले की, एकदा अशा प्रकारे आवाहन करुन हमी कार्यान्वित करुन शासनाच्या निधीतून आयुर्विमा महामंडळाच्या कर्जाबाबतची परतफेड वगैरे करण्यात आली तर, कदाचित यापुढे शासन अशा कर्जांना हमी देण्याचेच नाकारेल. परिणामी, अंतिमतः प्राधिकरणाचेच नुकसान होईल.

या संदर्भात शासनाने मे 97 मध्येंच आक्षेप घेतलेला होता तर लगेच जून 1997 मध्ये ही कार्यक्रम बाब मांडून हा मुद्या प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या ध्यानांत आणून द्यावयास हवा होता असे सदस्य श्री.सुरेश पटवर्धन यांनी मत व्यक्त केले. त्यांनी पुढे असेही म्हटले की, कर्जफेड करणे ही मंडळाची /प्राधिकरणाची जबाबदारी नाही. तथापि, प्राधिकरणाने परतफेड केली नाही आणि राज्य शासनानेही हमी कार्यान्वित करुन रक्कम उपलब्ध करुन दिली नाही तर अखेरीस शासनाच्या प्रतिमेला इजा पोहचते आणि म्हणून प्राधिकरणास उपलब्ध निधीतून रक्कम वळवावी लागते आणि मग रक्कम कोणी वळविली, कोणाची जबाबदारी होती असे आक्षेप उपस्थित केले जातात.

प्रधान सचिव, वित्त विभाग यांनी असे स्पष्ट केले की, शासनाकडून देय असलेल्या अनुदानातून जर रक्कम वसुल करता येण्याजोगी नसेल तर या प्रकरणी नगर विकास विभागाने काय कार्यवाही केली याबाबत विचार करणे उचित राहील. ग्रामीण योजनांसाठी कर्ज उचलले होते आणि ही रक्कम वापरण्यात आली तर आर्थिक अनियमततेचा प्रश्न कोठे उपस्थित होतो आणि व्याजाची रक्कम देण्यास शासन का नकार देत आहे या विचारणेवर वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी असा खुलासा केला की, ग्रामीण योजनांसाठी आयुर्विमा महामंडळाकडून कर्ज प्राप्त झालेले होते. तथापि, काही काळ यातील काही रक्कम त्या योजनांवर न वापरता इतरत्र वापरावी/वळवावी लागली आणि म्हणून शासनाकडून अनियमिततेचे आक्षेप घेण्यात आले आहेत. त्यावर वित्त विभागाच्या प्रधान सचिवांनी अशी सूचना केली की, प्राधिकरणाच्या वरिष्ठ अधिका-यांनी संबंधित कागदपत्रे घेऊन त्यांना भेटावे आणि ते त्यात लक्ष घालतील. अर्थात ठराव मंजुर होण्यास त्यांची हरकत नाही हेही त्यांनी स्पष्ट केले.

चर्चे अखेरीस सदस्य श्री.सुरेश पटवर्धन यांनी असा मुद्या मांडला की, या महत्वाच्या बाबीवर प्रत्येक बैठकीत त्या-त्या वेळच्या परिस्थितीवर चर्चा करण्यात यावी, त्यांच्या या मुद्यास अध्यक्ष महोदयांनी दुजोरा दिला.

अखेरीस पुढीलप्रमाणे ठराव मंजुर करण्यात आला.

<u>ठराव :-</u>

"असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिरकणाला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कर्जपरतफेडीसाठी इ. तसेच हस्तांतरीत न झालेल्या योजना चालू ठेवण्यासाठी करावा लागणारा अपरिहार्य खर्च हा योजना अंतर्गत प्राप्त झालेल्या अनुदानातून योजना बाहय: बाबीसाठी निधी वळवून करावा लागतो, त्यामुळे एक प्रकारे स्थानिक स्वराज्य संस्थांना अप्रत्यक्ष मदत केली जाते, त्यांच्या वतीने

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पर्यायाने शासन, कर्ज परत फेड करत असते, परंतु असे केले नाहीतर शासनाच्या पाणी पुरवठयाचा कालबध्द कार्यक्रम राबविण्यांत अनंत अडचणी उद्‌भवतील म्हणून अपरिहार्य परिस्थितीत नाईलाजाने प्राधिकरणास जो योजनांतर्गत निधी वळवावा लागतो त्यास हया ठरावाव्दारे मान्यता देण्यात येत आहे. तसेच प्राधिकरणातर्फे आयुर्विमा महामंडळास कर्ज परतफेडीसाठी दि.1/6/97 व 1/12/97 रोजी भरण्यांत आलेली रकम रु.153.00 लाख शासनाकडून प्रतिपूर्ती करण्यास मान्यता देते. यासाठी शासनास पुन्हा विनंती करण्यांत यावी."

**<u>कार्यक्रम बाब क्र.11 : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या बळकटीकरणासाठी नागरी आणि परिसर अभ्यासाकरिता प्रादेशिक केंद्र, हैद्राबाद (Regional Centre for Urban & Environmental Studies) यांना "सल्लागार सर्व्हिसेस" म्हणून नियुक्ती करणेबाबत.</u>**

मुख्य अभियंता(बाहय अर्थसहाय्य) यांनी प्रस्तावित प्रकरणी अशी माहिती दिली की, प्राधिकरणाचा निदानोपयोगी अभ्यास करण्याचा जो प्रस्ताव आहे, त्यासाठी हैद्राबादच्या उस्मानिया विश्वविद्यालयातील प्रादेशिक केंद्राला एकूण 22 लाख रुपये देण्याचे आदेश 4 एप्रिल 1998 च्या शासन निर्णयात दिल्याप्रमाणे प्रसृत झालेले आहेत. दरम्यान या प्रादेशिक केंद्राचे प्रमुख डॉ.लक्ष्मीपती हे दिनांक 18 मे 1998 रोजी मुंबईस आले होते व त्यांनी या प्रकरणी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे अपर मुख्य सचिव व प्राधिकरणाचे नाशिकचे मुख्य अभियंता तथा मुख्य अभियंता(बाहय अर्थसहाय्य) यांच्याशी चर्चा केली.

या प्रादेशिक केंद्राने शासनास पाठविलेल्या मूळ अंदाजाप्रमाणे या अभ्यासास एकूण 53 लाख रुपये खर्च अपेक्षित आहे व त्यात प्राधिकरणाने करावयाच्या 26 लाख रुपये अंदाजित खर्चाचा समावेश आहे. या सर्वच बाबतीत शासनाकडून सुधारित आदेश काढणे अपेक्षित आहे. तथापि, या कामास लवकरात-लवकर सुरुवात करावयाचे ठरले आहे आणि त्यापोटी प्राधिकरणास कराव्या लागणा-या खर्चासाठी प्राधिकरणाच्या संचालक मंडळाचीही अनुमती अपेक्षित आहे. तेंव्हा आता मांडण्यात आलेला सुधारित ठराव मंजूर करण्यात यावा अशी मुख्य अभियंता(बाहय अर्थसहाय्य) यांनी विनंती केली. मा.मंत्री महोदयांनी असा अभिप्राय व्यक्त केला की, अशा त-हेने अभ्यास करुन घेणे हा एक चांगला, उपयुक्त उपक्रम आहे आणि म्हणून त्यानुसार पुढीलप्रमाणे ठराव मंजूर करण्यात आला.

<u>ठराव :-</u>

ठराव करण्यात येतो की," शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या परिच्छेद क्र.2 च्या, 4 एप्रिल 1998 च्या निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा निदानोपयोगी अभ्यास करण्यासाठी, उस्मानिया विश्वविद्यालयाच्या,हैद्राबाद येथील प्रादेशिक केंद्रास(रिजनल सेंट्रल फॉर अरबन ॲन्ड ऍनाव्हायरॉनमेंटल स्टडीज) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संबंधित अधिकारी, कर्मचा-यांच्या सहकार्याने हे काम पूर्ण करण्यासाठी सल्लागार म्हणून नियुक्ती करणेबाबत या ठरावाव्दारे प्राधिकरणाची मान्यता देण्यांत येत आहे. प्राधिकरणाचे सदस्य सचिव(प्रशासन व बाहय अर्थसहाय्य) यांना या केंद्राशी याबाबत सामंजस्य करार करण्यासाठी अधिकार देण्यांत येत आहेत.

तसेच वर उल्लेख करण्यात आलेल्या हैद्राबाद प्रादेशिक केंद्रास 22 लाख रुपये वा शासन अंतिमतः आदेश देईल तेवढी रकम टप्प्या-टप्प्याने अदा करण्यात यावी.

तसेच या कामासाठी येणा–या उक्त संस्थेच्या पदाधिका–यांच्या महाराष्ट्रातील वास्तव्याचा(हॉटेल), वाहतुकीचा खर्च आर्थिक भारासह प्राधिकरणाने भागवावा व शासन या संदर्भात निधी उपलब्ध करुन देईपर्यंत हा सर्व खर्च प्राधिकरणाच्या ई.टी.पी. रकमेतून करावा असा ठराव करण्यात येत आहे.

शिवाय या अभ्यासाच्या अनुषंगाने परिच्छेद क्र.5 मध्ये उल्लेख केल्यानुसार 26 लाख रुपये, वा, शासन जी मर्यादा मंजूर करेल. त्या मर्यादेच्या आधीन राहून प्रत्यक्षांत येईल तो खर्च करण्यांत प्राधिकरणास अनुमती देण्यात येत आहे. सुरुवातीस हा खर्च प्राधिकरणास ई.टी.पी. चार्जेसव्दारे प्राप्त होणा–या निधीतून केला जावा."

**<u>कार्यक्रम बाब क्र. 12 : खुलताबाद गिरीस्थान नगरपरिषद (जिल्हा–औरंगाबाद) पाणी पुरवठयाचे दर कमी करणे.</u>**

या कार्यक्रम बाबीवर थोडीशी चर्चा झाली. या पाणी पुरवठा केंद्रावर तोटा येत असतो व खुलताबाद नगरपालिकेकडून पाणी पुरवठा बिलापोटी एकूण किती येणे आहे, याची माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी असे सुचविण्यात आले. प्रस्तुत प्रकरणी व्यावसायिक दृष्टया विचार करण्यांत येत नसून, प्राधिकरणातर्फे सामायिकरित्या (पूलड्) पाण्याचा दर लावण्यात येत असल्यामुळे खुलताबाद नगरपालिकेस जी काही सूट दिली जाईल, तेवढा बोजा इतर पाणी पुरवठा केंद्रांच्या ग्राहकांवर पडेल असे सदस्य श्री.सुरेश पटवर्धन यांनी ध्यानात आणून दिले. त्यांनी असेही म्हटले की, हे पाणी पुरवठा केंद्र हस्तांतरीत करण्याचा विचार पूर्वी करण्यात आला होता व त्यासाठी काही मुदतही देण्यात आली होती. त्यानुसार जर कार्यवाही झाली तर पाणी पुरवठा केंद्र नगरपालिकेकडे हस्तांतरीत होईल व पाणी पुरवठयाचे दर नगरपालिकाच ठरवेल आणि प्राधिकरणाने पाण्याचे दर कमी करण्याची बाब आपोआपच बारगळेल हेही स्पष्ट करण्यात आले. त्यावर मा.मंत्री महोदयांनी असे आदेश दिले की, याबाबतीत पुन्हा चर्चा करुन प्राधिकरणास नगरपालिकेकडून येणे असलेल्या रकमेचा बोजा पाहून हप्ते बांधून द्यावे काय, याबाबतच्या सर्व बाबींचा विचार करावा लागेल.

तेंव्हा या बाबीवरील चर्चा पुढे ढकलावी, असे ठरले.

**<u>कार्यक्रम बाब क्र.13 : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या पर्वती सर्व्हे नंबर 114 (पुणे सिंहगड रस्ता) पुणे मधील काही जागा पुणे महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्याबाबत.</u>**

कार्यक्रम बाबी संबंधी पुण्याचे मुख्य अभियंत्यांनी थोडक्यात माहिती दिली. प्रस्तुत प्रकरणी प्राधिकरणास पुणे महानगरपालिकेस निधी देण्याचे नसून हस्तांतरीत करावयाच्या जागेची किंमत महानगरपालिकेकडूनच प्राप्त झाल्यावर जमिनीचे हस्तांतरण व्हावयाचे आहे. तथापि, पुणे महानगरपालिकेने मुठा नदीवर बांधावयाच्या पुलाच्या जोडरस्त्याचे काम या आधीच हाती घेतलेले असल्यामुळे याबाबत निर्णय घेणे जरुरीचे आहे, ही बाब त्यांनी ध्यानांत आणून दिली. तद्नंतर पुढील प्रमाणे ठराव मंजूर करण्यात आला.

<u>ठराव :–</u>

"पुणे येथील पर्वत सर्व्हे नंबर 114 मधील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या जागेपैकी सुमारे 3655 चौ.मी. जागा पुणे महानगरपालिकेच्या मागणीनुसार मुठा नदी वरील पुलाच्या जोड

रस्त्यासाठी पुणे महानगरपालिकेस हस्तांतरित करण्यात यावी व त्याचे बदल्यात त्याच भागात समान क्षेत्रफळाएवढी पर्यायी जागा महानगरपालिकेकडे मागण्यात यावी. पर्यायी जागा संपादित झाल्यानंतर विषयांकित जागा पुणे महानगरपालिकेस हस्तांतरीत करावी. पर्यायी जागा उपलब्ध नसल्यास उपसंचालक नगररचना, पुणे यांनी केलेल्या जागेच्या मुल्यांकनानुसार महानगरपालिकेकडून किंमत प्राप्त झाल्यानंतर सदर जागा महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यात यावी. याबाबत पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार सदस्य सचिव यांना देण्यात येत आहेत."

**कार्यक्रम बाब क्र :—14 :बृहत आराखडयातील योजनांची अंमलबजावणी करणे संदर्भात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा 1998—99 चा अंमलबजावणीचा कार्यक्रम व निधीची उपलब्धता.**

मुख्य अभियंता(बाहय अर्थसहाय्य) यांनी ही कार्यक्रम बाब मांडण्याचा उद्देश, कार्यक्रम बाबीतील आकडेवारी या बाबतची माहिती दिली अशी नोंद घेण्यात आली की, प्रगतीपथावरील योजनांसाठी त्यातल्यात्यात आवश्यक त्या प्रमाणात निधी उपलब्ध होण्याची शक्यता आहे. मात्र एकूण टँकरमुक्ती कार्यक्रम लक्षात घेतल्यास निधीची गरज रु.645/— कोटी (वा त्याहून जास्त असताना) निधीची उपलब्धता मात्र सुमारे रु. 408/— कोटी एवढीच राहील. म्हणजे कमीत—कमी सुमारे 200 कोटी रुपयांच्या आसपास तूट भासते. ग्रामीण क्षेत्रातील एकूण कार्यक्रमाचा आढावा घेतल्यास एकूण निधीची गरज रु. 2454/— कोटी असताना निधीची उपलब्धता सुमारे रु.632/— कोटी राहील असे दिसते. म्हणजे एकूण तूट सुमारे 1822/— कोटी रुपये (75 टक्के) राहील.

शासनाने घेतलेला हा महत्वाकांक्षी कार्यक्रम 2000 सालापर्यंत पूर्ण करावयाच्या दृष्टीने सर्व प्रयत्न करावे लागतील व निधी उपलब्ध करुन देण्यावर भर दयावा लागेल आणि त्या दृष्टीने मा.मुख्यमंत्र्यांबरोबर लवकरात—लवकर चर्चा करण्यात यावी असे अध्यक्ष महोदयांनी सुचविले. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागच्या अपर मुख्य सचिवांना त्यांनी अशी सूचना दिली की, लवकरात—लवकर मा.मुख्यमंत्र्यांबरोबर या विषयावर चर्चा करण्यासाठी बैठकीची वेळ ठरवून घेण्यात यावी.

अल्पबचत मोहिमे अंतर्गत महाराष्ट्रात जी गुंतवणूक झाली त्यातील किती निधी केंद्र शासनाकडून राज्य शासनास प्राप्त झाला, त्यातील किती रक्कम पाणी पुरवठा कार्यक्रमांसाठी उपलब्ध होऊ शकेल याबाबतही संबंधित अधिका—यांशी चर्चा करावी असेमा.मंत्री महोदयांनी अपर मुख्य सचिवांना सुचविले. स्वेच्छा उत्पन्न घोषणा योजने अंतर्गत केंद्र शासनाकडून राज्य शासनाचा जो वाटा अपेक्षित आहे त्यातून निधी उपलब्ध करुन देता येईल काय, याबाबत प्रयत्न करण्यात यावे असेही एका सदस्यांनी सुचविले.

मा.मंत्री महोदयांनी अशीही माहिती दिली की, श्री.बंगारु लक्ष्मण या केंद्रीय मंत्री महोदयांशी झालेल्या चर्चेनुसार त्यांना अशीही माहिती मिळाली आहे की, ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी केंद्र शासनाकडून यंदा 500 /— कोटी रुपयांच्या आसपास निधी उपलब्ध होण्याची शक्यता आहे. त्या संदर्भात राज्य शासनाने आपला प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठवून निधी मिळविण्याबाबत प्राधान्याने प्रयत्न करण्याबाबत मा.मंत्री महोदयांनी सूचना केल्या. त्यावर अपर मुख्य सचिवांनी असे ध्यानांत आणून दिले की, या संदर्भात केंद्र शासनाचे आणि राज्य शासनाचे निकष वेगळे असून, केंद्र शासनाच्या निकषात बसू शकेल अशाच योजनांना निधी उपलब्ध होऊ शकतो. यावर मा.मंत्री महोदयांनी अशा सूचना दिल्या की, केंद्र शासनाच्या निकषामध्ये बसू शकणारे सर्व प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठवावे. दि.1 जून 1998 रोजी केंद्र शासनाचा अर्थसंकल्प सादर होणार असून, जे राज्य या संदर्भात आपला प्रस्ताव लवकरात—लवकर

पातळीवर त्यांना निधी उपलब्ध होण्याची जास्तीत–जास्त शक्यता आहे.

निधी उपलब्ध होण्याबाबतच्या अशा परिस्थितीत मा.मुख्यमंत्र्यांबरोबर होणा–या बैठकीत निर्णय लागेपर्यंत, मुख्यतः ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी निविदा काढण्याबाबत थोडीशी सबुरी स्विकारावी अशा मा.मंत्री महोदयांनी सूचना दिल्या.

तेंव्हा पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे अपर मुख्य सचिवांनी असे अभिप्राय व्यक्त केले की, ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या एकूण कार्यक्रमांसाठी (गरज रु. 2454/– कोटी– उपलब्ध निधी रु. 632/– कोटी.) निधीची जी गरज आहे असे सांगण्यात येत आहे ती कितपत वस्तुस्थितीला धरुन आहे हे पाहण्याची गरज आहे. तेंव्हा या संदर्भात योजनांना प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असणे व निविदा स्विकारणेबाबत/काढण्याबाबत कार्यवाही झाली असणे , याबाबतची प्रत्यक्ष वस्तुस्थिती महत्वाची ठरु शकेल. त्यांनी अशा सूचना केल्या की, प्रगतीपथावरील योजनांच्या संदर्भात बांधील (Commited) निधीची गरज किती, तसेच निविदा स्विकारल्या आहेत पण प्रत्यक्षात काम सुरु झालेले नाही वा निविदा स्वीकारण्याच्या टप्प्यावर आहेत अशांचे बाबतीत निधीची वाजवी गरज , याचबरोबर ज्या कामासाठी निविदा मागविण्यात आल्या आहेत त्यांची निधीची वाजवी गरज याबाबत माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच या माहितीची किमान गरजा कार्यक्रम व वर्धीत वेग कार्यक्रम अशी फोडही देण्यात यावी असे त्यांनी सुचविले.

## नागरी योजना

अशाच प्रकारे नागरी योजनां संदर्भातही माहिती देण्यात आली. त्यावरुन असे दिसून आले की, जर कर्जरोखे उभारण्यात आले (रु.299 कोटी) तर प्रगतीपथावरील योजनांच्या संदर्भात निधीच्या उपलब्धतेबाबत फारशी अडचण नाही. तसेच सर्वसाधारण नवीन योजनांसाठी व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून कर्ज घेऊन अंमलबजावणी करावयाच्या योजनांबाबत निधीच्या उपलब्धतेबाबत फारशी अडचण नाही. सुमिटोमो बँकेच्या अर्थसहाय्याने हाती घ्यावयाच्या योजनांबाबत मात्र बँकेकडून प्रत्यक्षात कर्जसहाय्य घेता आल्यासच निधी उपलब्ध करुन देता येईल. त्यावर मा.मंत्री महोदयांनी अशी टिप्पणी केली की, सुमिटोमो बँकेकडून कर्जसहाय्य मिळण्याबाबत फारसे आशावादी राहण्यात अर्थ नाही.

नागरी पाणी पुरवठा योजनांच्या संदर्भात निधिच्या आवश्यकतेबाबत जी माहिती देण्यात आली आहे, त्यामध्ये अनुदानाची रकम किती व कर्जाची रकम किती अशी विचारणा अपर मुख्य सचिवांनी केली. त्यावर अशी माहिती देण्यात आली की, सुमारे 511/– कोटी रुपयांची रक्कम अनुदानापोटी (यामध्ये कर्ज म्हणून घेतलेल्या रकमेचा काही अंशाचा अनुदान म्हणून करावयाचा वापर याचाही समावेश आहे) व उरलेली सुमारे 375/– कोटी रुपयाची रक्कम ही कर्ज म्हणून वापरावयाची आहे.

अनुदानाचे एवढे वाढीव प्रमाण कसे, या अपर मुख्य सचिवांच्या विचारणेवर मुख्य अभियंता (बाहय अर्थसहाय्य) यांनी अशी माहिती दिली की, धरणाच्या खर्चाचे भांडवली अंशदान व लांबवरुन, पाणी आणण्यासाठी येणा–या खर्चापैकी , नियमानुसार येणारा वाटा या दोन्ही प्रकरणी येणारा खर्च अनुदान म्हणून मान्य करण्याचा शासनाने जो निर्णय अलीकडे घेतलेला आहे, त्यामुळे अनुदानाची टक्केवारी वाढलेली आहे. त्यांनी अशीही माहिती दिली की, 1998–99 च्या वार्षिक कृती योजनेच्या संदर्भात जी बैठक झाली त्यातील इतिवृत्तामध्येही या गोष्टीची नोंद घेण्यात आली आहे.

....29...

नागरी योजनांसाठी सुध्दा केंद्र शासनाकडून वर्धीत वेग कार्यक्रमा अंतर्गत निधी मिळविण्याचे प्रयत्न करण्यात यावे असे मा.मंत्री महोदयांनी सांगितले. 20,000 पर्यंत वा त्याहून जास्त पण 25,000 पर्यंत लोकसंख्या असणा–या लहान शहरांसाठी सध्या निधी उपलब्ध होण्याची शक्यता आहे. या संदर्भात मुख्य अभियंता(बाहय अर्थसहाय्य) यांनी माहिती दिली की, यापूर्वी 1996 मध्ये महाराष्ट्र पाणी पुरवठा मंडळाने या कार्यक्रमा अंतर्गत 30 योजना केंद्र शासनास सादर केल्या होत्या. तथापि, एकूण उपलब्ध निधीची तरतूद पहाता, त्यापैकी काहीच योजना मान्य केल्याचे केंद्र शासनाच्या अधिका–यांनी अनौपचारिकरीत्या सांगितले होते. त्यावर बदललेल्या परिस्थितीत व या आधी आपण केंद्र शासनाकडून मिळवायच्या निधी संदर्भात केलेल्या सूचनांच्या अनुषंगाने जास्तीत–जास्त नागरी योजना सुध्दा केंद्र शासनाकडे लवकरात–लवकर पाठविण्याचा प्रयत्न करावा असे आदेश मा.मंत्री महोदयांनी दिले.

हुडकोकडून कर्ज उचलण्याबाबतचे प्रस्ताव या आकडेवारीत समाविष्ट आहेत काय अशी अपर मुख्य सचिवांनी विचारणा केली. त्यावर मुख्य अभियंता(बाहय अर्थसहाय्य) यांनी असा खुलासा केला की, अर्थसंकल्पीय तरतूदी व अर्थसंकल्प बाहय तरतूदी या संदर्भात शासनाने ज्या सूचना केल्या आहेत, त्या ध्यानांत घेऊन ही कार्यक्रम बाब तयार करण्यात आली आहे. तसेच आजवर महापालिकांनी परस्पर हुडकोकडून कर्जसहाय्य घ्यावे (उदा.सोलापूर व नागपूर महानगरपालिका) असे धोरण होते अशी माहिती देण्यात आली. असे असले तरी, तथापि, हुडको वाढीव प्रमाणात नगरपालिकांना सुध्दा कर्जसहाय्य देण्यास तयार आहे अशी आपली माहिती असून, त्या दृष्टीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिका–यांनी प्रयत्न करावे अशा अपर मुख्य सचिवांनी सूचना केल्या.

केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध करुन घेण्याच्या संदर्भात मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या स्तरावर केंद्रीय मंत्र्यांना एक खास पत्र पाठविण्यात यावे अशीही सूचना एका सदस्याने केली.

अशा प्रकारे कार्यक्रमबाबीतील माहितीची नोंद घेण्यांत आली.

**आयत्या वेळच्या बाबी**:– 78 व्या सभेमध्ये चर्चा न झालेल्या खालील बाबी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पत्र क्र.मजीप्रा/सभा क्र.78/आ–4, दि.6 मे 1998 अन्वये सर्व सदस्यांना फिरवून मंजूरीसाठी सादर केल्या होत्या. परंतु सदस्यांकडून मान्यता न आल्याने व 79 वी बैठक आयोजील्यामुळे या बैठकीत आयत्या वेळच्या बाबी म्हणून ठेवण्यासाठी मा.अध्यक्षांची परवानगी मागितली.

1) सिमेंटचा पुरवठा व विभागवार वितरण व्यवस्था.
2) अमरावती मंडळातील पाणी पुरवठा केंद्रावरील पाण्याची देयके सहकारी बँकांमार्फत स्वीकारण्याबाबत.
3) नागरी भागाकरीता कमी खर्चाची स्वच्छता योजना, वैयक्तीक, सार्वजनिक शौचकूप बांधकामाकरीता हुडकोकडून रु.30.00 कोटी पर्यंत कर्ज उभारणी.

या तीन बाबींपैकी अनु.क्र.2 व 3 या दोन बाबी आयत्यावेळच्या बाबी म्हणून सादर करण्यांस मा. अध्यक्षांनी परवानगी दिली.

1) <u>हुडकोकडून कर्ज उभारणीस मंजूरी</u>

ही बाब मंजूर करण्यात आली व खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

ठराव :—

"ठराव करण्यांत येतो की, नागरी भागामध्ये उर्वरित 136 नगरपालिका / महानगरपालिका करिता कमी खर्चाची स्वच्छता योजना अंतर्गत प्राप्त होणार असलेल्या वैयक्तीक शौचकूप व सार्वजनिक शौचकूप बांधकामाकरिता प्राधिकरण ढोबळ मानाने अंदाजे रु.30 कोटी पर्यंत हुडको कर्ज, कर्जाच्या शर्ती व अटीसह स्विकारण्यास मान्यता देण्यांत येते.

असाही ठराव करण्यांत येतो की, सदस्य सचिव/वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांना सदरहू कर्जासाठी हुडकोकडे संपर्क साधण्याबाबत व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अधिकार देण्यांत येत आहे."

2) **विषय :अमरावती मंडळातील पाणी पुरवठा केंद्रावरील पाण्याची देयके सहकारी बँकांमार्फत स्वीकारण्याबाबत.**

ही बाब मंजूर करण्यांत आली व खालीलप्रमाणे ठराव करण्यांत आला.

ठराव :—

"ठराव करण्यात येतो की, अधीक्षक अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,अमरावती मंडळ यांच्या अधिपत्याखालील अमरावती पाणी पुरवठा केंद्रावरील पाणी पुरवठा देयके स्वीकारण्याचे काम" दि. खामगांव अर्बन को.ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड,खामगांव" यांना त्यांच्या अमरावती शहरातील 5 शाखांमार्फत देयके स्वीकारण्यासाठी देण्याचा प्रस्ताव त्यांनी दिलेल्या दरानुसार म्हणजे प्रती देयके रुपया एक प्रमाणे तसेच अटी व शर्तीनुसार मंजूर करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे "खामगांव अर्बन को.ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, खामगांव" यांच्या अमरावती शहरातील कामाचा अनुभव पाहून त्यांना अमरावती मंडळांतर्गत इतर ठिकाणी म्हणजे अंजनगांव, अचलपूर येथील पाणी पुरवठा केंद्रावरील देयके स्वीकारण्याचे काम त्यांनी दिलेल्या दरानुसार तसेच अटी व शर्तीनुसार देण्याच्या प्रस्तावासही मंजुरी देण्यात येत आहे. याबाबतची पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार सदस्य सचिव/वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांना देण्यात येत आहेत."

3) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची स्थानिक स्वराज्य संस्थाकडील थकबाकी

याबाबत एक स्वतंत्र बैठक घेण्यात यावी असे ठरविण्यात आले.

3) **अनुषंगीक बाबी**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील अभियंते, बिगर अभियंते या संवर्गातील मंजूर पदांपैकी काही प्रकरणी नेमणूक करणे व अन्य प्रकरणी अन्य खात्यातून प्रतिनियुक्तीवर घेणे , याबाबतची कार्यवाही लवकरात–लवकर करण्यात यावी. म्हणजे आवश्यक त्या प्रमाणात अधिकारी, कर्मचारी उपलब्ध करुन देता येतील असे आदेश अध्यक्ष महोदयांनी दिले. त्यावर प्रधान सचिव, वित्त विभाग यांनी असे ध्यानांत आणून दिले की, जी पदे 6 महिन्यापासून जास्त काळ रिक्त रहातात, ती आपोआपच विगत होतात. तथापि, अशा बहुसंख्य प्रकरणी रिक्त पदे भरली नसली तरी अशा पदांचा इतरांकडे अतिरिक्त कार्यभार सोपवून व्यवस्था केलेली असते. तेंव्हा अशा अडचणी येण्याचे कारण नाही असे अभिप्राय अपर मुख्य सचिवांनी व्यक्त केले.

मा.मंत्री महोदयांनी बैठकीच्या अखेरीस असे निर्णय घेतले की, निविदा मागविताना त्याची व्याप्ती काय असावी, परप्रांतातील कंपनीला निविदा न देणे व महाराष्ट्रातील कंत्राटदारांना काही विशेष पसंती देणे. लघु उद्योग विकास महामंडळाकडून पाईप घ्यावयाचे बंधन ठेवणे किंवा कसे निविदांसाठी एकदा कालावधी ठरविला जाईल त्यावर त्यास मुदत वाढ न घेणे आणि नवीन वाढीपोटी काही रकम न

....31...

देणे. एवढेच नव्हेतर एक्स्ट्रा आयटेमवर बंधन आणणे इत्यादी ज्या महत्वाच्या बाबी इतर बैठकीत चर्चेला आल्या त्यावर अधिक व सखोलपणे विचार करण्यासा ठी दि. 30 मे 1998 रोजी सकाळी 11.00 वाजतां मा.मंत्री महोदयांच्या दालनामध्ये मा.उपाध्यक्ष, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे अपर मुख्य सचिव, सदस्य श्री.सुरेश पटवर्धन व प्राधिकरणाचे सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी एकत्रित येऊन विचार विनिमय करावा. या बैठकीत ज्या शिफारशी केल्या जातील त्यापुढे दुपारी 12.00 वाजता होणा--या प्राधिकरणाच्या रितसर बैठकीपुढे मांडण्यात याव्यात व त्याबाबत अंतिम निर्णय घेण्यात यावा.

सर्व उपस्थितांचे आभार मानल्यावर बैठक समाप्त झाली.

sabha-81